## आता 'ते' सगळीकडे फिरताहेत –राज ठाकरे



**मुंबई :** मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी (दि. २७) ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरेंनी भाजपशी युती तोडून महाविकास आघाडीसोबत सत्ता स्थापन करण्यावरून राज यांनी हल्लाबोल केला. मुंबईतील नेस्को सेंटरमध्ये आयोजित गटाध्यक्ष मेळाव्यात ते बोलत होते. उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र सोडताना राज ठाकरे म्हणाले, काल–परवा मुख्यमंत्रिपदावर असलेले आणि आता बाहेर पडलेले तब्येतीचे कारण सांगून बाहेर पडत नव्हते. एकनाथ शिंदेंनी एका रात्रीत कांडी फिरवली आणि आता ते सगळीकडे फिरत आहेत. यांच्यासारखा वागणाऱ्यातील मी नाही. स्वार्थ आणि पैशांसाठी दिसेल त्याचा हात धरायचा आणि बागेमध्ये कोपऱ्यात जाऊन बसायचे हे असले धंदे मी करीत नाही. मराठी किंवा हिंदुत्वाच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरेंवर एकतरी गुन्हा दाखल आहे का, असा सवालही त्यांनी केला.


सोमवार, २८ नोव्हेंबर २०२२

वर्ष १५ • अंक १३१

www.ramprahar.com

# राम प्रहर

पाने ८ • किंमत ₹ २ • रायगड


### अंतरंग


नाशिकमधील आश्रमशाळेत अल्पवयीन मुलींवर अत्याचार/२

श्रद्धा वालकरच्या हत्येचा पनवेलमध्ये निषेध/३

रोहा तालुका निवड चाचणी कुस्ती स्पर्धा/८


# मद्यविक्रीविरोधात कडकडीत बंद खारघरमध्ये प्रदुषणाविरोधात निषेध रॅली



**पनवेल : वार्ताहर**

दारूमुक्त खारघरसाठी भाजपसह सर्व राजकीय पक्ष, संस्था–संघटना आणि नागरिकांच्या वतीने रविवारी (दि. २७) कडकडीत बंद पाळण्यात आला. नो लिकर झोन असलेल्या खारघरमध्ये मद्यविक्रीला परवानगी नकोच, अशी एकमुखी मागणी या वेळी करण्यात आली.

खारघर हे सुसज्ज शहर म्हणून ओळखले जाते. येथील लोक सुशिक्षित व शांतताप्रिय आहेत, मात्र या शहरात सुरू झालेल्या हॉटेल निरसुख पॅलेसला बारचा परवाना मिळाल्यामुळे येथील संस्कृतीला धक्का बसला आहे. मागील महाविकास आघाडी सरकारच्या काळात ही परवानगी मिळाल्याचे समोर आले असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

खारघरमधील बारचा परवाना रद्द करण्यात यावा या मागणीसाठी रविवारी शहरात बंद पाळण्यात आला. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या बंदमध्ये व्यापारी, रिक्षाचालकांसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी त्यांनी दारूमुक्तीच्या घोषणा दिल्या. खारघर शहर गेल्या १५ वर्षांपासून नो लिकर झोन म्हणून ओळखले जात आहे, मात्र येथे बारसाठी परवाना मिळाल्याने खारघरच्या दारूमुक्तीला धक्का बसला आहे. संबंधित परवाना रद्द करावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

बंदसाठी सर्वपक्षीय उपस्थित होते. भाजपकडून खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, कीर्ती नवघरे, विजय पाटील, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, व्यापारी सेल संयोजक राजेंद्र मांजरेकर, उपाध्यक्ष बीना गोगरी, महिला सरचिटणीस साधना पवार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते हजर होते.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसीतील कंपन्यांमधून खारघरलगत असणाऱ्या खाडीमध्ये घातक व विषारी रसायने सोडली जात आहेत. पाण्याबरोबरच खारघरची हवादेखील प्रदुषित झाली आहे, मात्र तळोजा एमआयडीसी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यावर उपाययोजना करताना दिसत नाहीत. त्यामुळे प्रदूषण निर्माण करणारे उद्योग आणि बेजाबदार अधिकारी यांच्या निषेधार्थ पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्या पुढाकाराने खारघरमध्ये रविवारी (दि. २७) सेक्टर १० प्रदूषणविरोधी समितीच्या वतीने निषेध रॅली काढण्यात आली होती. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही या रॅलीत सहभागी होत निषेध व्यक्त केला.

तळोजा एमआयडीसीत असलेल्या कंपन्यांचे प्रदूषणयुक्त सांडपाणी नाल्यांमध्ये सोडले जाते आणि ते खारघरमधून वाहत असल्याने येथील नागरिकांना याचा प्रचंड त्रास होत आहे. असे असताना तळोजा एमआयडीसी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यावर उपाययोजना करताना दिसत नाहीत. त्याच्या निषेधार्थ रॅली काढण्यात आली होती. बँक ऑफ इंडिया येथून या रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीत माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी सभापती नरेश ठाकूर यांच्यासह भाजप खारघर शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय, आरती नवघरे, दिलीप जाधव, गीता चौधरी, बीना गोगरी, नितीन पालकर, सुरेश ठाकूर, मीरा घुगे, नेहा यादव, सुषमा शुक्ला, प्रज्ञा जैन, श्रृती नेमा, गुरूनाथ तोडकर, पूजा काटेकर, सविता, सत्यपाल चुग, अरविंद जैन, जे. एन. झा, सोनावण, मोहनसिंग बिस्ट, विलास सावंत, जयकुमार पांडे, संजय सायगावकर, तुकाराम घोडके, नीलकमल शर्मा, अर्पणा मट्टा, दिलीप पांचाळ, नामदेव इंगळे, कैलास राव, राजीव दुबे, देवेंद्र यादव, मनोज नेमा, नितीन पागेराट यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चाचा समारोप लिटिल वर्ल्ड मॉल येथे करण्यात आला.

### ...अन्यथा आंदोलन करणार!

प्रदूषणामुळे खारघरमधील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तळोजा एमआयडीसीतील कंपन्यांमधून खाडीत सोडल्या जाणाऱ्या रसायनांच्या उग्र वासामुळे श्वसनाचे त्रास, डोळे चुरचुरणे व लाल होणे अशा समस्या उद्‌भवू लागल्या आहेत. त्यामुळे या कंपन्यांवर कारवाई करावी; अन्यथा आम्हाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली या विरोधात आंदोलन करावे लागेल, असा इशारा या वेळी नरेश ठाकूर यांनी दिला. जर आम्हाला न्याय मिळाला नाही तर पर्यावरणमंत्र्यांपर्यंत हा विषय घेऊन जाऊ, असेही त्यांनी सांगितले.




## उद्धव ठाकरेंची मानसिकता ढळलीय

### मुख्यमंत्री शिंदेंचा टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी बुलढाण्यातील सभेमध्ये शिंदे गटाच्या गुवाहाटी दौऱ्यावर आणि कामाख्या देवीच्या मंदिरातील दर्शनावर टीका केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. २७) खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले.

'त्यांच्याकडून आणखी काय अपेक्षा करणार. त्यांची मानसिकता ढळली आहे. नैराश्यातून अशा प्रकारचे वक्तव्य त्यांच्याकडून होतंय. मला वाटत होते की, नैराश्य यायला त्यांना फार वेळ लागेल, पण ते आधीच आले आहे,' असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाकरेंना लगावला.

हेलिकॉप्टरमधून अतिवृष्टीग्रस्त भागाचा दौरा केल्याची टीका उद्धव ठाकरेंनी बुलढाण्यात केली होती. त्यावर बोलताना मी जे करतो ते खुलेआम करतो. लपून–छपून करीत नाही. काही लोक लपून–छपून करतात, पण अशी कामे उजेडात येतात. ती लोकांना माहिती होतात, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सगळ्या जगाला माहिती आहे की हे जे बोलतायत ते छोटे छोटे खोके आहेत. मोठे खोके घेण्याची ऐपत आमदारांची आहे का? फ्रीजएवढ्या कंटेनरमधले खोके कुणाकडे जातात आणि ते कोण पचवू शकते हे सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे. एक दिवस हे सगळे जनतेच्या समोर येईल. दीपक केसरकरांनी सूचक विधान केले आहे. मी त्याचा आता शोध घेतो आणि नंतर त्यावर बोलतो.

यापूर्वीही महाराष्ट्रात नकारात्मकता होती. ते वातावरण आम्ही सरकार बनविल्यानंतर बदलले आहे. एक सकारात्मकता तयार झाली आहे. आमच्या सरकारबद्दल लोकांचे मत चांगले आहे. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. छातीत धडकी भरली आहे. त्यांना धक्क्यावर धक्के बसताहेत. त्या धक्क्यांतून ते सावरलेले नाहीत. त्यामुळे अशा प्रकारचे वक्तव्य त्यांच्याकडून होतंय, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### निवडक

#### समान नागरी कायदा हा राष्ट्रीय मुद्दा –नड्डा

**नवी दिल्ली :** समान नागरी कायदा हा केवळ गुजरातचा नाही तर राष्ट्रीय मुद्दा आहे. हा कायदा जास्तीत जास्त राज्यांमध्ये लागू व्हावा, अशी आमची इच्छा असल्याचे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी म्हटले आहे. ते गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलत होते. जाहीरनाम्यात मोफत घोषणा करण्यावरून त्यांनी आम आदमी पक्षावर आसूड ओढला. काँग्रेस आणि आप सत्तेत येणार नाही हे त्यांना चांगले ठावूक आहे. त्यामुळे ते फुकटच्या घोषणा करीत असल्याचे नड्डा म्हणाले.

#### 'आयओए' अध्यक्षपदी पीटी उषा यांची निवड निश्चित



**नवी दिल्ली :** भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्षपदी भारताची दिग्गज धावपटू पीटी उषा यांची निवड होणार आहे. या पदासाठी इतर कोणीही उमेदवारी दाखल केली नसल्याने उषा यांची निवड जवळपास निश्चित झाली आहे, असे 'आयओए'चे अधिकारी उमेश सिन्हा यांनी सांगितले.

## पंढरपूरचे विठ्ठल मंदिर दिसणार मूळ रूपात

### ७३ कोटी ८० लाखांचा आराखडा मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर ७०० वर्षांपूर्वीच्या मूळ रूपात दिसणार आहे. यासाठी ७३ कोटी ८० लाखांचा आराखडा राज्य शासनाने मंजूर केला आहे. या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांच्या मार्गदर्शनाखाली हाय पॉवर समितीची बैठक ३० नोव्हेंबर रोजी मुंबई येथे बोलाविण्यात आली आहे. त्यामुळे आता लवकरच या कामाला सुरुवात होण्याच्या आशा वाढल्या आहेत.

भाविकांचे श्रद्धास्थान पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हे अकराव्या शतकातील असल्याचे अभ्यासक मनात असले तरी त्याही पूर्वीपासून विठूरायाचे हे मंदिर अस्तित्वात असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. आता पुन्हा ७०० वर्षांपूर्वीच्या मूळ मंदिराप्रमाणे त्याला रूप देण्यासाठी पुरातत्व विभागाच्या सूचनेनुसार आराखडा बनविण्यात आला आहे. या आराखड्याचे पाच टप्प्यांत काम केले जाणार असून यात मंदिराला मूळ हेमाडपंथी रूप देण्यासाठी जिथे दगडांची झीज झाली आहे अशा ठिकाणी रासायनिक संवर्धन केले जाणार आहे. याशिवाय मंदिराचे आयुष्य वाढविण्यासाठी मजबुतीकरणाचे काम केले जाणार आहे. विठ्ठल मूर्तीला हानिकारक असलेले गाभाऱ्यात बसविलेले ग्रॅनाईट हटवून त्यामागील दगडी बांधकाम मूळ स्वरूपात आणणार आहेत. याशिवाय नव्या पद्धतीने बांधलेले नामदेव महाद्वाराच्या आरसीसी काम पाडून तेथे मूळ मंदिराला शोभेल अशा पुरातन दगडात महाद्वार बनविले जाणार आहे.

## पनवेल अर्बन बँक निवडणुकीसाठी मतदान





(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**आज निकाल**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल को–ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवारी (दि. २७) मतदानप्रक्रिया झाली. यासाठी व्ही. के. हायस्कूल येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीचा निकाल दुसऱ्या दिवशी म्हणजेच सोमवारी (दि. २८) लागणार आहे.

गेल्या ३० वर्षांपासून पनवेल अर्बन बँकेवर शेकापची सत्ता राहिली आहे, मात्र दीर्घकाळ सत्ता असतानाही या बँकेचा शाखा विस्तार आणि विकास झालेला नाही. बँकिंगच्या दृष्टिकोनातून ग्राहकांना सोयीसुविधाही मिळत नाही. त्यामुळे या वेळी शेकाप व मित्रपक्षांच्या महाआघाडीविरोधात भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना युती अशी लढत आहे. महाआघाडीच्या सहकार पॅनलविरोधात भाजप युतीने उत्कर्ष पॅनल उभे करून आव्हान दिले. एकूण १३ जागांसाठी २७ उमेदवार पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

या निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मतदानाचा हक्क बजावला. युतीच्या वतीने पोलिंग बूथवर भाजपचे जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः कमान सांभाळत मतदारांना उत्कर्ष पॅनेलला निवडून आणण्याचे आवाहन केले. त्यांच्यासमवेत भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भूपेंद्र पाटील तसेच माजी नगरसेवक–नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




**खोपोली : महिलांची बुलंद तोफ असलेल्या भाजप महिला मोर्चाच्या नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या उपस्थितीत रविवारी उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या वतीने महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी महिला मोर्चाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या हस्ते वाघ यांचे स्वागत करण्यात आले. या मेळाव्यास भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल आदी उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे) **वृत्त उद्याच्या अंकात.**

## चंद्रपुरात रेल्वेपुलाचा भाग कोसळला

### २० जण जखमी

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशाह रेल्वेस्थानकावर रविवारी (दि. २७) दुर्घटना घडली. पादचारी पुलाचा एक भाग कोसळून २० प्रवासी जखमी झाले आहेत. त्यातील आठ जणांची प्रकृती गंभीर आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बल्लारशाह रेल्वेस्थानकातील फलाट क्रमांक १ वरून ४कडे प्रवासी पादचारी पुलावरून जात होते. तेव्हा या पादचारी पुलाचा एक भाग कोसळला. त्यामुळे ६० फूट उंचीवरून प्रवासी थेट खाली रेल्वेच्या रूळावर पडले. यामध्ये २० जण जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## तरुणांनी जी–२० परिषदेत सहभागी व्हावे



### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आवाहन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २७) मन की बात कार्यक्रमाद्वारे देशवासीयांना संबोधित केले. या वेळी त्यांनी जी–२० शिखर परिषदेचा उल्लेख करीत यामध्ये देशातील तरुणांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

आगामी २०२३मध्ये होणाऱ्या जी–२० शिखर परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे आहे. १ डिसेंबरपासून भारत औपचारिकपणे जी–२० परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारणार आहे. नुकतीच इंडोनेशियामध्ये १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी १७वी शिखर परिषद झाली. या परिषदेच्या समारोप सत्रात इंडोनेशियाच्या राष्ट्रपतींनी प्रतिकात्मकपणे जी–२०परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे म्हणजे पंतप्रधान मोदी यांच्याकडे सुपूर्द केले.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी म्हणाले की, तेलंगणातील एका जिल्ह्यात बसलेला माणूसही जी–२० परिषदेसारख्या शिखराशी किती जोडलेला आहे हे पाहणे चांगले आहे. पुण्याचे रहिवासी सुब्बा राव चिल्लारा आणि कोलकाता येथील तुषार जगमोहन यांनी जी–२० परिषदेसंदर्भात भारताच्या प्रयत्नांचे खूप कौतुक केले आहे.

#### विणकराकडून लोगो भेट

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगणाच्या राजन्ना सिरसिल्ला जिल्ह्यातील विणकर येल्दी हरिप्रसाद गरू यांचा विशेष उल्लेख केला. त्यांनी स्वत: विणलेला जी–२० शिखर परिषदेचा लोगो पंतप्रधान मोदींना भेट म्हणून पाठविला आहे. पंतप्रधान मोदींनी जी–२० शिखर परिषदेचा लोगो पाठवल्याबद्दल येल्दी यांचे या वेळी आभार मानले.

# खोक्यांचा एक तरी पुरावा आणून दाखवा!

## आमदार संजय गायकवाड यांचे उद्धव ठाकरेंना आव्हान



**बुलडाणा : प्रतिनिधी**

बुलढाण्यातील चिखली येथील शनिवारी झालेल्या सभेत उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर टीका केल्यानंतर आता शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी उद्धव ठाकरेंना जाहीर आव्हान दिले आहे. खोक्यांचा एक तरी पुरावा आणून दाखववावा. जर त्यांनी असे केले, तर आयुष्यभर आम्ही त्यांचे पाय चेपत बसू, असे आमदार गायकवाड यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरेंनी सभेत बोलताना एकनाथ शिंदे सरकारवर परखड शब्दांत टीका केली. काही जण ४० रेडे घेऊन गुवाहाटीला गेले आहेत. तुम्हा सर्वांच्या साक्षीने या ४० रेड्यांनी, गद्दारांनी त्यांच्यात मर्दानगी शिल्लक असेल, तर जाहीर सांगावे की, ते भाजपाच्या तिकीटावर निवडणूक लढणार नाही, अशा शब्दांत ठाकरेंनी शिंदे गटाला लक्ष्य केले होते.

या संदर्भात एका वृत्तवाहिनीशी बोलताना संजय गायकवाड यांनी उद्धव ठाकरेंच्या वक्तव्याची चिरफाड केली. पहिली गोष्ट तर शेतकऱ्यांचा मेळावा म्हणून त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले, पण जेवढ्या लोकांनी तिथे भाषण केले त्यातले कुणीही शेतकऱ्यांविषयी बोलले नाही. शेतकऱ्यांच्या व्यथा, दु:ख, अडचणी किंवा शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाने काय करावे यावर विरोधी पक्ष म्हणून ते काहीही बोलू शकले नाहीत. जे बोलले त्यात खोके, बोके याशिवाय त्यांच्याकडे दुसरा कुठला विषयच नव्हता. त्यामुळे त्या शेतकरी मेळाव्यातून काही निष्पन्न झाले असे काही दिसले नसल्याचे आमदार गायकवाड म्हणाले.

खोके आणि बोके. खोक्यांशिवाय गेल्या तीन–चार महिन्यांत त्यांना दुसरा कुठला विषय मांडता आला का? उद्धव ठाकरेंनी सीआयडी वगैरे जेवढ्या यंत्रणा असतील त्या लावून या खोक्यांचा एक तरी पुरावा आणून दाखववा. जर त्यांनी असे केले, तर आयुष्यभर आम्ही त्यांचे पाय चेपत बसू. त्यांनी फक्त एकदा हे सिद्ध करून दाखववे, अशा शब्दांत आमदार गायकवाड यांनी ठाकरेंना आव्हान दिले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या यंत्रणांना या ४० खोक्यांचा शोध घ्यावा लागेल, पण एवढे मात्र नक्की आहे की, 'मातोश्री'वर आतापर्यंत जेवढे खोके गेलेत, त्याच्या एक टक्क्यामध्येही आमचा विषय नाही, असे सूचक विधानही आमदार गायकवाड यांनी या वेळी केले.

### रेडा हे यमाचे वाहन –ना. सामंत

**उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेनंतर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ठाकरे गटाला लक्ष्य केले आहे. उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर देताना त्यांची चिडचिड होत असल्याचा टोला मंत्री सामंत यांनी लगावला आहे. 'पाच महिन्यांपूर्वी आम्ही चाळीस आमदार 'वाघ' होतो. आम्ही उठाव केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर आम्ही 'रेडा' झालो. किती ती चिडचिड? मी कुठंतरी वाचलंय 'रेडा हे यमाचं वाहन आहे,' असे मंत्री उदय सामंत यांनी ट्वीट करून म्हटले आहे.**

## नाशिकच्या आश्रमशाळेत सहा अल्पवयीन मुलींवर अत्याचार

### संचालकावर गुन्हा; कोठडीत रवानगी



**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकच्या म्हसरुळ येथील ज्ञानपीठ आधार आश्रमशाळेतील सहा अल्पवयीन मुलींवर संचालकाने आश्रमातील अत्याचार केल्याची घटना घडली आहे. तीन दिवसांपूर्वीच या प्रकरणी एका पीडितेने तक्रार दिली होती. पोलिसांनी अधिक चौकशी केल्यानंतर आणखी अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी नराधम संचालकावर गुन्हा दाखल झाला असून न्यायालयाने त्याची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

तीन दिवसांपूर्वी एका पीडित विद्यार्थिनीने आश्रमशाळेचा संचालक हर्षल मोरेविरोधात तक्रार दिली होती. या तक्रारीनंतर मोरेला पोलिसांनी अटक केली. यानंतर पोलिसांनी आश्रमातील इतर विद्यार्थीनींचे जबाब नोंदवले. त्यात आणखी पाच अल्पवयीन मुलींसोबत असाच प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

पोलिसांना हर्षल मोरेविरुद्ध पोक्सो आणि बलात्कारासह अॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा नोंद केला आहे. त्याला न्यायालयासमोर सादर केले असता बुधवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपी आपल्या सासूसह ही आश्रमशाळा चालवत होता. यापूर्वीही गतिमंद आश्रमशाळेत त्याने असाच प्रकार केल्याच समोर आले आहे.

## एपीएमसीमध्ये परदेशी हापूसची पेटी दाखल




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळ बाजारात परदेशातील आफ्रिकन मलावी हापूसचे ८०० बॉक्स शनिवारी (दि. २६) बाजरातील व्यापारी संजय पानसरे यांच्याकडे दाखल झाला आहे. हापूस म्हटला की रत्नागिरी, देवगड हापूसची गोडी डोळ्यासमोर येते. देवगडचा हापूस अवीट गोडीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र बाजारात परदेशातील मलावी हापूस देखील दाखल झालेला आहे. त्यामुळे ग्राहक देशी हापूसबरोबरच परदेशी हापूसला पसंती देत आहेत.

एपीएमसी बाजारात मार्चमध्ये देवगड हापूसचा खरा हंगाम सुरू होतो. मात्र बाजारात गेल्या काही वर्षांपासून परदेशी मलावी हापूस दाखल होत आहे. आज बाजारात ८०० बॉक्स आवक झाली असून एका बॉक्समध्ये ९ ते १६ नग असतात. बाजारात आज प्रतिबॉक्स पाच हजार रुपये ते ३ हजार ७०० रुपये दराने मलावी हापूसची विक्री झाली. पुढील आठवड्यात बुधवारी आणि गुरुवारी एक हजार बॉक्स दाखल होतील, अशी माहिती व्यापारी संजय पानसरे यांनी दिली आहे.

११ वर्षांपूर्वी रत्नागिरीमधून हापूस आंब्याच्या काड्या मलावी मध्ये नेवून लागवड करण्यात आली होती. सुमारे ४०० एकरवर आंब्यांच्या काड्यापासून कलम तयार करून लागवड करण्यात आली होती. आता त्याला फळधारणा होत आहे. नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यातील वातावरण त्याठिकाणी पोषक असते. त्यामुळे यादरम्यान त्याठिकाणी मलावी हापूसचे उत्पादन घेतले जाते. १५ डिसेंबरपर्यंत या मलावी हापूसचा हंगाम सुरू रहाणार आहे.

## सीकेटी महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय कैडेटकोर युनिटच्या वतीने महाविद्यालयात संविधान दिन शनिवारी (दि. २६) साजरा करण्यात आला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी घटनात्मक तथा लोकशाही मूल्यांचे रोपण करण्यासाठी विशेष अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले. या वेळी दृष्टीफाउंडेशनचे अध्यक्ष किशोर देवधेकर व महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे प्रमुख कॅप्टन प्रो. डॉ. यु. टी. भंडारे यांनी विद्यार्थांना संबोधित करताना नागरिकांची मुलभूत अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करत त्यांच्या राष्ट्राप्रती असणाऱ्या कर्तव्यांबाबत जाणीव करून दिली. याबरोबरदृष्टी फाउंडेशने महाविद्यालयातील प्राध्यापकांना भारतीय संविधान तथा एनसीसी कॅडेट्स वउपस्थित समग्र विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वितरण केले व अंततः सर्व उपस्थितांना जबाबदार नागरिक बनण्याची शपथ देऊन समारोहाची इतश्री करण्यात आली.

या वेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. रमाकांत नवघरे, मराठी विभागाचे प्रमुख प्रा. एम. एम. अंबुलगेकर, असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर कॅप्टन डॉ. उद्धव भंडारे, सीटीओ प्रा. नीलिमा तीदार, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी ऑफिसर कॅप्टन डॉ. उद्धव भंडारे, सीटीओ प्रा. नीलिमा तीदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उरण महाविद्यालयात करिअरबाबत कार्यशाळा




**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अकाउन्टंसी विभागाच्या वतीने अकाउन्टंसी व टॅक्स क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या विषयावर कार्यशाळा आयोजित केली गेली

प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. के. ए. शामा यांनी केले. त्यांनी सीए होण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी बालगले पाहिजे, असे सांगितले. सुपर मेघा करियर कान्सलिंग नवी मुंबई यांच्या सहकार्यने आयोजित या कार्यक्रमात सीए सुभाश देसाई यांनी सीए होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी आवष्यक आहे व अभ्यास कसा करावा या विषयी सविस्तर माहिती सांगितली व विद्यार्थ्यांनी मोठी ध्येय साध्य केली पाहिजे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा. रियाझ पठाण, प्रा. हन्नत शेख, प्रा. मेघा रेडडी, प्रा. विनेता तांडेल, प्रा. पुजा गुप्ता यांनी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## केबीपी कॉलेजमध्ये विविध उपक्रमांनी संविधान दिन साजरा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये (केबीपी) भारतीय संविधान दिन विविध उपक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील प्रा. डॉ. एन. डी. पाटील रिसोर्स सेंटर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय भारतीय संविधान वाचन हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमात सुमारे २५० विद्यार्थ्यांनी संविधानाचे सलग वाचन केले. दोन दिवसीय उपक्रमाच्या समारोपा वेळी डॉ. आबासाहेब सरवदे यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व आणि वस्तुस्थिती या विषयावर मार्गदर्शन केले. विज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. व्ही. बी. पुजारी यांनी अध्यक्षीय मनोगतात नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांचे महत्त्व विशद केले.

महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांच्या वर्गामध्ये शिक्षकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले तसेच २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांना एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी परेडद्वारे अभिवादन केले. अनामी फाऊंडेशन आणि महाविद्यालय यांच्या वतीने मी आणि माझे संविधान याविषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत २२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी मार्गदर्शन केले. विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, उपप्राचार्या डॉ. राजश्री घोरपडे, ग्रंथपाल मानसी रसाळ, एनएसस प्रमुख डॉ. लक्ष्मण गवळी, एनसीसी प्रमुख प्रा. गायत्री भागवत, प्रा. प्रणिता भाले, प्रा. निलेश नलावडे आदींनी प्रयत्न केले.

## उरणमध्ये भरदिवसा धुक्याची चादर

### धुके की प्रदूषण नागरिकांमध्ये शंका



**उरण : रामप्रहर वृत्त**

सध्या थंडीची चाहूल लागली असूनत्सकाळी काही प्रमाणात वातावरणात धुके होते, मात्र दुपारी ३ वाजल्या नंतरही उरण शहर व परिसरात धुक्याचेच वातावरण दिसत होते. त्यामुळे हे खरंच धुकं आहे की, हवेतील वाढते प्रदूषण अशी शंका उरणमधील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. सध्या वातावरणात क्षणा क्षणाला बदल होत आहेत. याचा परिणाम मानवी जीवन आणि आयुष्यावर पडू लागला आहे.

यामध्ये लांबणारा पाऊस, वेळी अवेळी कधीही कोसळधार,उशिरा सुरू झालेली थंडी, कडक ऊन यामुळे कोणता ऋतु कधी सुरू होतो आणि संपतो याचा अंदाज येत नाही. अशीच काहीशी स्थिती सध्या उरण मधील वातावरणात दिसू लागली आहे. उरण मधील औद्योगिक परिसरात निर्माण होणारा धूर, रस्त्यावरील खड्ड्यामुळे होत असलेली धूळ याचाही परिणाम होऊन वातावरणात धुळीकणाचे प्रमाण ही वाढले आहे. दिवसभर धुरके वातावरण निर्माण होणे हे हवेतील प्रदूषणाचे लक्षण असल्याची शक्यता आहे. त्यामुळे उरणमधील हवाही आता प्रदूषित झाली असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वावेघर येथे मोफत रक्त तपासणी शिबिर



**रसायनी : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे वावेघर गणपती मंदिर येथे ब्लड, शुगरची ३२ रुग्णांची चाचणी मोफत रविवारी (दि. २७) करण्यात आली.

या वेळी डॉ. धीरज जैन व डॉ. मिलिंद भगत यांनी सहकार्य केले व या कॅम्पसाठी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावळे व महिला सदस्य प्रतीक्षा कुरंगले उपस्थित होत्या.

## निवडक

### अपघातात एक ठार; एक जखमी

**पनवेल :** पनवेल जवळील पळस्पे ते जेएनपीटी जाणाऱ्या लेनवर एका मोटरसायकलवर झालेल्या अपघातात मोटरसायकल स्वाराचा दुर्दैवी मुर्त्यू झाला आहे. त्याचा सहकारी जखमी झाला आहे. पळस्पे ते जेएनपीटी जाणाऱ्या लेनवरील पुष्पकनगर ब्रिज उतरल्यानंतर मोटरसायकलस्वार किरण कलांबे (वय ३०, रा. कोपरखैरणे) याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल हयगयीने व अविचाराने चालवून त्याच्या पुढे असलेल्या अज्ञात वाहनाला पाठीमारून ठोकर मारून झालेल्या अपघातात तो स्वतः गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू पावला आहे तर त्याचा सहकारी उत्तम अलसे (वय ३२, रा.कल्याण) हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये वृद्ध व्यक्तीची फसवणूक

**पनवेल :** एका वृद्ध व्यक्तीला सोशल मिडियावर व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांना दोन लाख १५ हजारांनी लुबाडल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. वृद्ध व्यक्ती घरात असताना त्यांना निशा अग्रवाल या नावाने अज्ञाताने व्हॉट्सअप व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क साधुन त्यांना व्हॉट्सअपवर अश्लिल फोटो पाठवले. त्यानंतर फिर्यादी यांना व्हिडीओ कॉलवर त्यांच्यासारखे वर्तन करावयास लावून त्याचा व्हिडीओ रेकॉर्ड केला. तसेच हे व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी देवून त्यांच्याकडून विविध बँक खात्यांवर एकुण २,१५,९९७ रुपये एवढी रक्कम पाठविण्यास भाग पाडली. आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात येताच वृद्ध व्यक्तीने शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# श्रद्धाच्या हत्येचा पनवेलमध्ये निषेध

## सकल हिंदू समाजातर्फे जनआक्रोश मोर्चा, जिहादमुक्त हिंदुस्तानचा नारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सकल हिंदू समाजाच्या वतीने पनवेलमध्ये श्रद्धा वालकर हिच्या निर्घृण हत्याकांडाविरोधात जन आक्रोश आणि निषेध मोर्चाचे आयोजन शनिवारी (दि. २६) करण्यात आले होते. जिहादी मानसिकतेच्या विरोधात पुकारलेल्या मोर्चामध्ये आणि जिहादमुक्त हिंदुस्तान आंदोलनामध्ये सकल हिंदू समाज सामुहिक एकतेने सहभागी झाले होते. शहरातील विसावा हॉटेलपासून निघालेला भव्य निषेध मोर्चा बाजारपेठमार्गे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या प्रांगणात समाप्त झाला.




सभेच्या सुरुवातीला भारत रक्षा मंचच्या राष्ट्रीय महिला मंच अध्यक्षा बिना गोगरी यांनी या मोर्चाच्या आवश्यकतेबद्दल आपले विचार मांडले. त्यानंतर संत समाजाचे प्रतिनिधी म्हणून रायगड जिल्हा वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष हभप पुंडलिक महाराज फडके यांनी आपले उद्बोधन केले. यानंतर पनवेल येथील सामाजिक कार्यकर्त्या अनिशा म्हात्रे हिने या घटनेवरील तरुणीचे मनोगत व्यक्त केले. परेश मुरबाडकर यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला या वेळी मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते उमेशजी गायकवाड यांनी हिंदू समाजावरील होणाऱ्या अन्यायाबाबत वाचा फोडली.

दरम्यान, जानवी शिंदे हिने जनजागृतीसाठी लव जिहाद वरील कविता सादर केली. शेवटी दत्तात्रय शिंदे यांनी सादर केलेल्या संपूर्ण वंदे मातरम गीताने निषेध मोर्चा आणि सभेचा समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. भूषण म्हात्रे यांनी केले. मोर्चात अनेक व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, विधीज्ञ, सन्माननीय नागरिक आणि महिलांचा लक्षणीय सहभाग होता.

या मोर्चात श्रद्धा वालकरचा मारेकरी अफताफविरोधात घोषणा देण्यात आल्या. श्रद्धाच्या हत्येचा आक्रोश आंदोलनकर्त्यांनी या वेळी व्यक्त केला तसेच अशा घटना पुढे होऊ नयेत म्हणून लव जिहादाच्या विरोधात कायदे करावेत, आरोपी आफताब पूनावाला लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी. यासोबतच त्याचे व त्याच्या कुटुंबीयांचे भारतीय नागरिकत्व रद्द करण्यात यावे, कारण अशा क्रुर नागरिकांना भारतामध्ये ठेऊ नये. अशा मागण्या या मोर्चातून करण्यात आल्या.

मोर्चामध्ये मुख्य वक्ता म्हणून हिंदू जागरण मंचाचे प्रांत कार्यकारीणी सदस्य उमेश गायकवाड मोर्चाला शेकडो लोकांची उपस्थिती होती. मोर्चा अतिशय शांततेत झाला असून समाजाच्या मागण्या पुढे निवेदने देऊन पोहचविण्यात येणार असल्याचे बिना गोगरी यांनी सांगितले.

# सीकेटी महाविद्यालयात शहिदांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय कैडेट कोर युनिटच्या वतीने महाविद्यालयात २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यात आले.




प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त नेव्ही ऑफिसर दीपक जांबेकर, तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के.पाटील यांची प्रमुख उपस्थित होते. सुरुवात २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील वीर जवानांना शोकशस्त्र जुनिअर अंडर ऑफिसर रोहित पालवे यांच्या नेतृत्वाखाली झाले. यानंतर एनसीसी कैडेट्सची भाषणे आणि देशभक्तीपर गीत गाऊन, मानवंदनेच्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

या वेळी महाविद्यालयाचे असोसिएट एनसीसी ऑफिसर कॅप्टन डॉ. उद्धव भंडारे, सीटीओ प्रा. नीलिमा तीदार, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थिती होते. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी ऑफिसर डॉ. भंडारे, सीटीओ प्रा. तीदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उरणमध्ये मिठाई दुकानाचे उद्घाटन

**उरण : बातमीदार**

उरणमधील पेढे, बर्फी स्वीट्सचे ग्राहकांचे विश्वसनीय दुकान म्हणून बालाजी कॉर्नर प्रसिद्ध आहे. बालाजी ग्रुप, सतेरे ब्रदर्स, पडवळ ब्रदर्स हे मराठी माणसाने स्थापन केलेले उद्योग समूह आहेत. या समुहाच्या माध्यमातून बालाजी कॉर्नर या स्वीट्स आणि स्नॅक्सच्या दुकानाचे उरण शहरातील सेंटमेरी हायस्कूल समोर शाखा सुरू झाली आहे. बालाजी कॉर्नरचे स्वीट्स आणि स्नॅक्सचे दुकान जनतेच्या सेवेत रुजू झाले आहे याचा सर्वांना अभिमान आहे, असे मत आमदार महेश बालदी यांनी उरण येथे केले.




बालाजी कॉर्नर या स्वीट्सच्या दुकानाचे उद्घाटन विद्यमान आमदार महेश बालदी यांनी फीत कापून केले. या वेळी बालाजी ग्रुप, सतेरे ब्रदर्स, पडवळ ब्रदर्सच्या सर्व सदस्यांचे, बालाजी कॉर्नरच्या टीमचे आमदार महेश बालदी या वेळी कौतुक केले.

सतेरे ब्रदर्सचे जयवंत सतेरे, दिनेश सतेरे, कैलास सतेरे, गिरीजात्मक सतेरे, पडवळ ब्रदर्सचे राकेश पडवळ, बालाजी ग्रुपचे स्वप्नील सतेरे, मयुरेश जाधव, शुभम सतेरे, गुड्डू यादव आदी उद्योजक या वेळी उपस्थित होते. नगरसेवक रवी भोईर, केगावचे सामाजिक कार्यकर्ते नितीन पाटील, नगरसेवक राजू ठाकूर, कौशिक शहा तसेच मनन पटेल, हितेश शहा, विशाल पाटेकर, अजित भिंडे, प्रीतम पाटील, कुणाल शिसोदिया, जस्मिन गॅस, संदीप पानसरे आदींनी बालाजी कॉर्नरला भेट दिली.

## दत्त जयंतीनिमित्त शिवाजीनगरमध्ये तीन दिवस अखंड हरिनाम सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशीर्वादाने शिवाजीनगर येथील बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात मार्गशीर्ष शुद्ध ते दत्त जयंतीपर्यंत मार्गशीर्ष शुद्धपोर्णिमा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते ७ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

बाळासाहेब महाराज नंदेश्वर यांच्या हस्ते बाळकृष्ण महाराज यांच्या गुरू चरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोथ एकनाथ भागवत पारायण पर्वणीचा प्रारंभ सोमवारी (दि. ५) होणार आहे. बुधवारी (दि. ७) दत्त जयंतीनिमित्त माऊलींवर पुष्पवृष्टी होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या भजन, प्रवचन, कीर्तन या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे व्यवस्थापक शिवाजीनगर-गव्हाण-खारकोपर-न्हावे-न्हावेखाडी संचलित देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) हे आहेत. तीन दिवस होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये रोज सकाळी काकड आरती, श्री ची नित्यपूजा, ग्रंथवाचन व ध्यान, भजन, प्रवचन, दुपारी आरती, सायंकाळी ग्रंथ वाचन व ध्यान, आरती, रात्री ग्रंथ वाचन व ध्यान, भजन व किर्तन होईल. यासोबतच मंगळवारी (दि. ६) श्री सत्यनारायणाची महापूजा ठेवण्यात आली आहे.

# कळंबोलीमधील उद्यानात पाणीपुरवठा

## बाळासाहेबांच्या शिवसेनेने केलेल्या मागणीला यश



**पनवेल : वार्ताहर**

बाळासाहेबांच्या शिवसेनेने केलेल्या मागणीला यश आले असून पनवेल महापालिकेने कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ५ येथील द. ग. तटकरे विद्यालयासमोर असलेल्या बगीचामधील रोपांना पाणीपुरवठा सुरू केला आहे.

पनवेल महापालिकेने कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ५ येथील द. ग. तटकरे विद्यालयासमोर बगीच्यामध्ये सुमारे दोन कोटी ६५ लाख रुपये खर्च करून बगीचा फुलविण्यात आला होता, मात्र या बगीचामधील रोपांना पावसाळा संपल्यापासून पाणी मिळत नसल्याने रोपे सुकू लागलेली आहेत. कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही पालिका त्याची निगा ठेवत नसल्याने परिसरातील निसर्गप्रेमी नाराजी व्यक्त केली. या सुकलेल्या रोपांची अवस्था पाहुन बाळासाहेबांची शिवसेनेतर्फे जिल्हासंपर्कप्रमुख रामदास शेवाळे, महाप्रमुख अ‍ॅड. प्रथमेश सोमण, सुमित सूर्यवंशी आदींनी पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात चार दिवसांत या बगीच्यामध्ये रोपांना पाणी पुरवठा देण्याच आदेश द्यावेत अन्यथा बाळासाहेबांची शिवसेना पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता लोकवर्गणी जमा करुन त्या वर्गणीतून पाणी पुरवठा आम्ही झाडांना करू, अशी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून या बगीचामधील रोपांना पाणीपुरवठा सुरू झाला आहे. याबद्दल बाळासाहेबांची शिवसेनेने पनवेल प्रशासनाचे आभार मानले आहे.

## भाजप युवा मोर्चा खारघरतर्फे संविधान दिन, शहिदांना अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा खारघर मंडलच्या माध्यमातून गिरीजा अनाथालयमधील लहान मुलांनी संविधान दिवस व २६/११मधील शहिदांना अभिवादन केले. खारघर पोलीस कर्मचाऱ्यांसोबत देशभक्तीचे गीत गाऊन व त्यांना गुलाबाचे फुल देऊन नागरिकांच्या सुरक्षतेसाठी सदैव कार्यरत राहण्यासाठी त्यांचे आभार मानले.

याचबरोबर सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वांबरोबर संविधान दिवसाची शपथ सुद्धा घेतली. या कार्यक्रमासाठी भारतीय जनता युवा मोर्चाचे विनोद घरत यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष शुभ पाटील, फुलाजी ठाकूर, या कार्यक्रमाचे पुढाकार घेणारे युवा मोर्चा सरचिटणीस अ‍ॅड. अमर उपाध्याय, किरण रावडे, सचिन चिखलकर, जितू धर्मराज सह गिरीजा अनाथ आश्रमचे व्यवस्थापक वसंतजी व सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये प्रशांत दामले यांचा सत्कार

## 'अटल करंडक'चेही देण्यात आले निमंत्रण

**पनवेल : वार्ताहर**

वर्षानुवर्षे रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांनी नुकतेच विश्वविक्रमी १२५०० प्रयोग केले. अश्याप्रकारे मराठी नाट्यसृष्टीत विश्वविक्रमी प्रयोग करणारे प्रशांत दामले एकमेव नट आहेत. प्रशांत दामले ह्यांनी प्रदीर्घ कारकिर्दीत ३७ चित्रपटांत आणि ३६ नाटकांत अभिनय केला आहे. आपल्या विश्वविक्रमी १२५०० प्रयोगानंतर पहिल्यांदाच प्रशांत दामले यांच्या नाटकाचा प्रयोग पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप सांस्कृतिक सेल व टीम अटल करंडक तर्फे प्रशांत दामले यांचं पनवेल मध्ये स्वागत करण्यात आले व त्यांच्या विश्वविक्रमानिमित्त यथोचित सत्कार करण्यात आला.



याचबरोबर त्यांना अटल करंडक विषयीमाहिती देत अंतिम फेरीला उपस्थित राहण्याचे आमंत्रण करण्यात आले आहे. या वेळी शामनाथ पुंडे, निखिल गोरे, संजीव कुलकर्णी, प्रतीकेश मोरे तसेच अटल करंडक टीमचे सदस्य उपस्थित होते. त्याचप्रमाणे बाळासाहेबांची शिवसेना पनवेलचे महानगरप्रमुख अ‍ॅड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी त्यांच्या पनवेल शहरातील पदाधिकाऱ्यांसह प्रशांत दामले यांचे अनोखे स्वागत केले. हाउसफुल असलेल्या सभागृहात प्रशांत दामले यांची नाट्यगृहात एन्ट्री होताच रंगमंचापर्यंत त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. यानंतर रंगमंचावर जाऊन नाट्यप्रयोग सुरू होण्याआधी शिवरायांची व नटराजाची प्रतिमा देऊन प्रशांत दामले यांचा शिवसेनेतर्फे सत्कार करण्यात आला.

या वेळी पनवेल महापालिकेने ही पालिकेच्या वतीने प्रशांत दामले यांचा सत्कार केला. यावेळेस महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, महापालिका आयुक्तांच्या सुविद्य पत्नी, उपायुक्त गणेश शेटे, बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, विभाग प्रमुख आशिष पनवेलकर, शाखाप्रमुख मंदार काणे, रमेश बेद तसेच 'आमचे आम्हीच' नाट्यसंस्थेचे नाट्य कलावंत व पनवेलकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सर्व पनवेलकर नाट्य रसिकांचे भाजप तसेच महापालिका व बाळासाहेबांची शिवसेना यांचे मी या अविस्मरणीय स्वागताबद्दल आणि सत्कार बद्दल आभार मानतो. तुमच्या पुढील पिढीलाही नाटकाची गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करा. माझी बॅकस्टेज टीम, कौटुंबिक सपोर्ट आणि तुम्हा सर्व नाट्य रसिकांमुळेच मी ही उंची गाठू शकलो.**

**–प्रशांत दामले, अभिनेता**

## इज ऑफ लिव्हिंग सर्वेक्षणाबाबत पनवेलच्या शाळांमध्ये वादविवाद स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

इज ऑफ लिव्हिंग इंडेक्सचा भाग म्हणून सिटीझन पर्सेप्शन सर्वेक्षण (सीपीएस) पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात आयोजित केले जात आहे. याच पार्श्वभूमीवरती या सर्वेक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी शनिवारी पिल्लई इंजिनिअरिंग कॉलेज, चांगू काना ठाकूर शाळा, बांठिया शाळा याठिकाणी महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.




इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स अंतर्गत सिटीझन पर्सेप्शन सर्वेक्षण भारतातील सुमारे २६४ शहरांमध्ये केले जात आहे. पनवेल महानगरपालिकेने ही यामध्ये सहभाग घेतला आहे. सिटीझन पर्सेप्शन सर्वेक्षणचा उद्देश शहरातील राहणीमानाच्या गुणवत्तेबद्दल नागरिकांचा अभिप्राय घेणे हा आहे. यामध्ये सार्वजनिक वाहतूक, शिक्षण सुविधा, आरोग्य सेवा, पाण्याची उपलब्धता, राहणीमानाचा खर्च, रोजगाराच्या संधी इत्यादींबाबत नागरिकांचा अभिप्राय घेतला जात आहे.

या सर्वेक्षणाविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने आज पिल्लई इंजिनिअरिंग कॉलेज, सीकेपी शाळा, बांठिया शाळा याठिकाणी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना सिटीझन पर्सेप्शन सर्वेक्षणाविषयी माहिती देण्यात आली. नागरिकांनी https://eol2022.org/citizenfeedback या लिंकवरती जाऊन पनवेल शहराचा युएलबी कोड ८०२७९६ वापरून आपला अभिप्राय द्यावा, असे आवाहन पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

## संपादकीय

# सांभाळून बोला; अन्यथा...

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व अन्य नेत्यांनी शनिवारी बुलडाण्यातील चिखली येथील सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सहकाऱ्यांवर टीका केली. सध्या त्यांच्याकडे तेवढाच एककलमी कार्यक्रम उरला आहे, पण त्यांनी एक लक्षात ठेवावे की ही मंडळी आता शिंदेंसोबत असली तरी पूर्वी तुमच्याकडेच होती. त्यामुळे ठाकरे गटाने तोलूनमापून बोलावे; अन्यथा बरेच काही बाहेर पडेल.

**शिवसेना... हिंदुत्वाच्या मुद्द्यावर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केलेली जाज्वल्य पक्षसंघटना. बाळासाहेब जोपर्यंत हयात होते तोपर्यंत शिवसेनेचा दरारा होता. शिवसेनाप्रमुखांचा शब्द प्रमाण मानला जात असे. बाळासाहेब तर शिवसेनेची मुलखमैदानी तोफ होतेच, पण त्यांच्याबरोबरच पक्षात अनेक एकाहून एक फर्डे वक्ते होते. शिवाय संघटन बळकट व एकसंध होते. बाळासाहेबांनंतर झालेला शिवसेनेचा ऱ्हास आणि अलीकडे फुटीनंतर झालेली अवस्था सर्वांसमोर आहे. खरेतर ही वेळ का आली याचे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे, मात्र त्यांच्यात तेवढी हिंमत व परिपक्वता कुठे आहे? केवळ वारसाहक्काने मिळालेली गादी चालविण्यात ते धन्यता मानत आहेत. तेही काम त्यांना धड जमत नाहीए. नाहीतर पक्षाची एवढी पडझड झाली नसती. शिवसेनेने सत्तेसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या परस्परविरोधी विचारसरणी आणि ध्येयधोरणे असलेल्या पक्षांबरोबर युती केली तिथेच त्यांच्या पतनाची बिजे रोवली गेली होती. बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेस-राष्ट्रवादीवर हल्ला चढविला त्याच पक्षांशी बाळासाहेबांची पुत्र उद्धव यांनी राजकीय सोयरिक केली. मुख्यमंत्रिपदाच्या महत्त्वाकांक्षेतून त्यांनी पक्षाचा बळी दिला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तत्कालीन परिस्थिती पाहून त्यांनी असा निर्णय घेतला असे मानले तरी सरकार स्थापन झाल्यानंतर जेव्हा दोन्ही काँग्रेसकडून शिवसेनेला दुय्यम वागणूक मिळू लागली तेव्हा मात्र उद्धव ठाकरे गप्प होते किंबहुना स्वतःच्याच पक्षाच्या आमदार, खासदार व अन्य नेत्यांना त्यांची साधी भेट होत नव्हती. मग लोकप्रतिनिधी आपली गाऱ्हाणी कुणापुढे मांडणार? राज्यातील महत्त्वाचे निर्णय असो की निधीवाटप शिवसेनेला नेहमीच मागेच ठेवले गेले. परिणामी मुख्यमंत्रिपदाची खूर्ची उद्धव यांना मिळाली असली तरी पक्षासाठी जे शिलेदार लढत होते त्यांच्या पदरी अवहेलना आली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह उठाव केला आणि त्यानंतरचा इतिहास सर्वच जाणतात. आमदार, खासदार, पदाधिकारी, कार्यकर्ते फुटत असल्याने आहेत ते लोक टिकविण्याचे आव्हान ठाकरेंसमोर आहे. यासाठी त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे असताना त्यांनी शिंदे व सहकाऱ्यांवर टीका करण्याचा एककलमी कार्यक्रम राबविला आहे. राजकारणात टीका-टिपण्णी होतच असते, पण त्यालाही मर्यादा असते. पातळी सोडून बोलण्यात काय मतलब. खासदार संजय राऊत तुरूंगात जाऊन आल्यानंतरही त्यांच्यात फरक पडलेला दिसत नाही, पण त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की ते ज्यांची बदनामी करीत आहेत ती मंडळी पूर्वी शिवसेनेतच होती. त्यांना तुमची सर्व अंडीपिल्ली माहीत आहेत. त्यामुळे बोलताना त्यांनी भान ठेवले, तर ठीक नाही तर प्रत्युत्तर मिळेलच, शिवाय पोलखोलही होऊ शकते. शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी ठाकरे गटाला गर्भित शब्दांत इशारा दिला आहे. आम्हालाही खूप काही गोष्टी माहीत आहेत. अशीच आमची बदनामी केलीत, तर आम्हीदेखील तोंड उघडू, असे सांगत त्यांनी आगामी संकेत दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात ठाकरे गटाच्या काही गुपित असलेल्या गोष्टी बाहेर आल्यास आश्चर्य वाटायला नको!**

# कर्जत तालुक्यात शिवसेनेच्या दोन गटांमध्ये लढत

**कर्जत : विजय मांडे**




कर्जत तालुक्यातील सात ग्रामपंचायतींच्या मुदती ऑक्टोबर २०२२मध्ये संपल्या होत्या. त्या सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणूका जाहीर झाल्या असून या निवडणुका शिंदे गट-भाजप युती विरुद्ध मविआ अशी निवडणूक रंगणार आहे. चार महिन्यांपूर्वी झालेल्या राजकीय नाट्यानंतर शिवसेनेत फूट पडून दोन गट झाले. एक शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट व दुसरा बाळासाहेबांची शिवसेना म्हणजे शिंदे गट. पहिला गट मविआमध्ये आहे तर दुसरा गट भारतीय जनता पक्षासोबत युती करून निवडणूक रिंगणात उतरणार आहे. या निवडणुकीत दोन्ही शिवसेनेच्या अस्तित्वाची निवडणूक ठरणार आहे. या निवडणुकांचे मतदान १८ डिसेंबर २०२२ रोजी होणार असून निवडणुकीची मतमोजणी व निकाल २० डिसेंबर २०२२ रोजी आहे.

तालुक्यातील दहिवली तर्फे वरेडी, उकरूळ, कळंब, वेणगाव, वावळोली, कोंदिवडे आणि मांडवणे या सात ग्रुप ग्रामपंचायतींच्या सदस्य मंडळाच्या मुदती संपल्याने सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या आहेत. निवडणुका लक्षात घेता राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. सात ग्रामपंचायतींमधील काही ग्रामपंचायती राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. २०१७मध्ये झालेल्या त्या सर्व सात ग्रामपंचायतींमधील सरपंच थेट जनतेतून निवडून आले होते आणि ही निवडणूकसुद्धा थेट सरपंच पद्धतीने होणार आहे.

वावळोली ग्रामपंचायतीमध्ये सार्वत्रिक निवडणूक होणार असून ही ग्रामपंचायत कर्जतचे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांची ग्रामपंचायत आहे. त्यात या ग्रामपंचायतीमध्ये आमदार थोरवे यांचा प्रमुख विरोधक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष होता आणि त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाची साथ मिळणार आहे. त्यामुळे वावळोली ग्रामपंचायत निवडणूक जिंकणे आमदार थोरवे यांच्यासाठी महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची बनली आहे. तसेच अनेक वर्षे उप जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सांभाळणारे शांताराम तथा भाई गायकर यांची वेणगाव ही ग्रामपंचायत सुद्धा महत्वाची आहे. या ग्रामपंचायतीचे सरपंच पद भाई गायकर यांनी सांभाळले होते. तर आता मावळते सरपंच म्हणून त्यांचा सुपुत्र अभिषेक गायकर हे होते. त्यामुळे ही निवडणूक सुद्धा शिवसेनेच्या दोन्ही गटांसाठी महत्वाची ठरणार आहे.

ऑक्टोबरअखेर मुदत संपलेल्या सात ग्रामपंचायतींमध्ये विद्यमान मावळते सरपंच हे वेगेवेगळ्या पक्षाचे होते आणि त्यावेळी या सर्व ग्रामपंचायती पुन्हा जिंकण्याचे मोठे आव्हान त्या पक्षांसमोर असणार आहे. उकरुळ ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस तर दहिवली तर्फे वरेडीमध्येदेखील सरपंच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडून आला होता. वावळोलीमध्ये शिवसेना पक्षाचा उमेदवार थेट सरपंच म्हणून निवडून आला होता आणि आज त्या शिंदे गटात आहेत. कळंबमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या थेट सरपंच बनल्या होत्या. नंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता आणि आज ते शिंदे गटात आहेत. वेणगावमध्येदेखील शिवसेनेचा थेट सरपंच निवडून आला होता आणि आज ते माजी सरपंच शिंदे गटात आहेत. कोंदिवडेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या थेट सरपंच निवडुन आल्या होत आहेत आणि कोरोना काळात त्यांचे निधन झाले आहे.

तालुक्यातील बदललेले राजकारण यामुळे मोठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे. तालुक्यातील शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षाची या निवडणुकीत भूमिका काय आहे यावरदेखील चुरस महत्त्वाची ठरणार आहे. तर भारतीय जनता पक्षदेखील निवडणुकीची तयारी करीत असल्याने चुरस रंगणार आहे, मात्र आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या दृष्टीनेदेखील तालुक्यातील सात ग्रामपंचायतींच्या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि युती यांची दिलजमाई होते काय? याबद्दलदेखील कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता आहे.

तालुक्यातील कोंदिवडे ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद सर्वसाधारण असल्याने चुरस दिसून येणार आहे. कळंब या मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या ग्रुप ग्रामपंचायतमध्ये १३ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद नागरिकांनाच मागास प्रवर्ग राखीव आहे. दहिवली तर्फे वरेडी या ग्रुप ग्रामपंचायतमध्ये ११ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव आहे.

वेणगाव या ११ सदस्यांच्या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच नागरिकांचा मागासप्रवर्ग महिला राखीव असून मांडवणे ग्रामपंचायतीमध्ये सात जागांसाठी निवडणूक होणार असून थेट सरपंचपद सर्वसाधारण महिला राखीव आहे तर उकरूळ ग्रामपंचायतीमध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंचपद सर्वसाधारण महिला राखीव आहे. वावळोली ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये नऊ जागांसाठी निवडणूक होणार असून तेथील थेट सरपंच सर्वसाधारण असल्याने राजकीय चुरस पाहायला मिळणार आहे.

शिवसेनेत दोन गट झाल्यानंतर तालुक्यात झालेल्या दोन ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत एका ग्रामपंचायतीत ग्रामविकास आघाडी तर एका ग्रामपंचायतीमध्ये महाविकास आघाडीने निर्विवाद यश मिळवले होते. त्यावेळी भारतीय जनता पक्ष शिंदे गटासोबत नव्हता तर महाविकास आघाडीबरोबर होता.


राज्यातील सरकार पाहता आता होणाऱ्या निवडणुकीत भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना यांची युती होईल याची शक्यता आहे.

| ग्रामपंचायत | प्रभाग | सदस्य | सरपंच आरक्षण |
|---|---|---|---|
| कळंब | ५ | १३ | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| दहिवली | ४ | ११ | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| वेणगाव | ४ | ११ | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| मांडवणे | ३ | ०७ | सर्वसाधारण महिला |
| उकरूळ | ३ | ०९ | सर्वसाधारण महिला |
| वावळोली | ३ | ०९ | सर्वसाधारण |
| कोंदिवडे | ३ | ०९ | सर्वसाधारण |



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलचे 'हे' फीचर करेल व्हॉट्सॲपसारखे काम



युजर्सना अधिकाधिक चांगली सेवा मिळावी हाच नेहमी गुगलचा प्रयत्न असतो. युजर्सना कोणत्या फीचर्सचा अधिक फायदा होईल आणि त्यांचे काम अधिक सोपे होईल याकडेदेखील कंपनी विशेष लक्ष देते. अशात टेक जायंट सर्च इंजिन गुगलने भन्नाट फीचर्स आणले आहे. या नवीन फीचरचा गुगल युजर्सना उत्तम युजर अनुभव मिळणार असून आता व्हॉट्सॲपप्रमाणेच तुम्ही गुगल मेसेजवर इमोजीद्वारे प्रतिक्रिया देऊ शकणार आहात. असे या ॲपच्या एका नवीन फीचरची चाचणी करताना दिसून आले.

गुगल आपल्या ॲपवर सतत अनेक नवीन फीचर्स जोडत आहे. सध्या ते डीफॉल्ट अँड्रॉइड मेसेजिंग ॲप म्हणजेच गुगल मेसेज सुधारण्यात गुंतले आहेत. कंपनी या ॲपवर नवीन फीचर्ससह अनेक गोष्टी जोडत आहे. गुगलने नुकतेच हे ॲप अपडेट केले असून, मेसेजिंग ॲपचे नवीन आयकॉनमध्ये बदल केला आहे. हे फीचर सध्या लेटेस्ट गुगल मेसेजेस बीटा टेस्टरसाठी उपलब्ध आहे. अशी अपेक्षा आहे की, कंपनी लवकरच ते सर्व वापरकर्त्यांसाठी रिलीज करेल. जाणून घेऊया नवीन अपडेटमध्ये कोण-कोणते फीचर देण्यात आले आहे.

गुगलच्या या फीचरमध्ये यूजर्सला फक्त सात इमोजीचा पर्याय मिळत होता. आता अनेक इमोजीचा यात पर्याय देण्यात येत आहे. तसेच कोणत्याही संदेशावर प्रतिक्रिया पाठवण्यासाठी, तुम्हाला हा संदेश बराच वेळ दाबावा लागेल. यानंतर, तुमच्यासमोर अनेक इमोजी पर्याय दिसतील, ज्यामधून तुम्ही तुमच्या आवडीचा पर्याय निवडू शकता. यासह, तुम्हाला + चे चिन्हदेखील दिसेल, ज्याच्या मदतीने तुम्ही त्यात एक नवीन इमोजी जोडू शकता. हे फीचर व्हॉट्सॲपच्या मेसेज रिॲक्शन फीचरसारखेच आहे आणि त्याच पद्धतीने काम करते.

तुम्हाला गुगलच्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर संदेश शेड्यूल करण्याचा पर्यायदेखील मिळेल. यासाठी कोणताही मेसेज टाईप केल्यानंतर सेंड बटण दाबून ठेवावे लागेल. यानंतर, तुम्हाला मेसेज पाठवण्यासाठी तीन डिफॉल्ट पर्याय मिळतील. याशिवाय, जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही तुमच्या स्वतःनुसार वेळ आणि तारीख सेट करू शकता.

# सामाजिक, शैक्षणिक क्रांतीचे जनक महात्मा फुले



## निमित्त

सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले. यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. त्यांचा विवाह बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांच्याशी झाला. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोर्हे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले. त्यांचे मूळ गाव कटगुण हे होते. आज महात्मा फुले यांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्या विषयी या लेखातून...

महात्मा फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने मुंबईतील सभेत १८८८मध्ये त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती. महात्मा फुलेंवर थॉमस पेन यांच्या 'The Right Of Man' या पुस्तकाचा प्रभाव होता.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत.

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

२८ नोव्हेंबर १८९० मध्ये थोर समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचे पुणे येथे देहावसान झाले. पुढे ७ वर्षे त्यांचा वारसा सावित्रीबाईंनी सांभाळला. तोच सत्याचा वारसा पुढे राजर्षी शाहूमहाराज व आंबेडकर यांनी नेला. म्हणूनच तर आजही महाराष्ट्राचा उल्लेख हा फुले, आगरकर, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा पुरोगामी महाराष्ट्र असा होतो. अनेक समाजसुधारक विषयक कामे त्यांनी केली, कोणत्याही जातीला समोर ठेवून नाही तर विशिष्ट वंचित घटकाला विशेषतः महिला वर्गाला, शेतकऱ्यांना व गरीबांना ज्यामुळे अनेक गोष्टी जशा न्यायाची, हक्काची, सत्याची जाणीव करून देणाऱ्या. जसे शहाजी राजेंच्या अनुपस्थितीत १७व्या शतकातील जिजाऊंनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी छत्रपती घडवला तसे तब्बल २०० वर्षांनी जोतीरावांच्या मदतीने सावित्रीबाईंनी शस्त्र हातात घेतले ते स्त्री शिक्षणाचे. कारण सगळ्या समस्यांचे निराकरण करणे केवळ शिक्षणानेच शक्य होते व ते ठराविक जणांना नाही तर त्यांच्यासोबत स्त्री व इतर वंचितांनाही मिळावे तेव्हाच हक्क, कर्तव्य व न्याय कळेल हे जोतीराव फुले जाणत होते.

१८९४ मध्ये राजर्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला व सावित्रीबाईंच्या निधनानंतर(१८९७) शाहूराजेंनी स्वकार्यासमवेत फुले कार्य देखील पुढें नेले. शाहू महाराज हेदेखील पुरोगामी विचारांचे होते.

राजे असल्याने अनेक अधिकार त्यांच्या हातात होते त्यामुळे महाराजांनी अनेक वंचित बहुजनांना व शेतकरी बांधवांना, महिलांना वेगवेगळे कायदे करून हक्कच मिळवून दिले. त्यांना पुढे डॉ. आंबेडकरांची साथ भेटली व बाबासाहेबांनी संविधानाच्या रूपाने कायदेशीररित्या न्यायाची मुहुर्तमेढ स्वतंत्र भारतातील सगळ्या जनतेसाठी केली.


सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**-हर्षल भगत, एक शिवप्रेमी**

## क्लिक...क्लिक...!



**खारघर : राज्यात पोलीस भरती जाहीर झाल्यानंतर पोलीस बनण्याचे स्वप्न उराशी बाळगणारी मुले व मुली यंदाच्या पोलीस भरतीसाठी जोरदार तयारीला लागले आहेत. हे दृश्य आहे शहरातील सेंट्रल पार्क परिसरातील पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या उमेदवारांचे.**



## आरोग्य प्रहर

# थंडीत 'ही' ड्रिंक्स पिण्याचे आरोग्यासाठी भरपूर फायदे



हिवाळ्याच्या दिवसात बऱ्याच जणांना कोरड्या त्वचेची समस्या भेडसावते. अशावेळी त्वचेची नीट काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. हिवाळ्यात त्वचा निरोगी राहण्यासाठी तुम्ही बऱ्याच प्रकारची हेल्दी पेयं पिऊ शकता. त्यामुळे तुमची त्वचा हायड्रेटेड आणि चमकदार ठेवण्यास मदत होईल. तसेच या पेयांमुळे आपल्याला आरोग्याचे इतरही अनेक फायदे मिळतील. थंडीच्या दिवसात पाणी कमी प्यायले जाते. अशा वेळी त्वचा हायड्रेटेड रहावी आणि चमकदार बनावी यासाठी तुम्ही खाली दिलेल्या पेयांचा आहारात समावेश करू शकता.

**सूप** – विविध भाज्यांचा वापर करून सूप तयार केले जाते. तुम्ही थंडीच्या दिवसात वेगवेगळी सूप पिऊ शकता. त्यामुळे तुमच्या पोटात सर्व भाज्याही जातील आणि तुम्ही हायड्रेटेडही रहाल.

**हिरव्या भाज्यांचा ज्यूस** – हिरव्या भाज्या या आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर ठरतात. हिरव्या भाज्यांचा रस अथवा ज्यूस हा अनेक पोषक तत्वांनी समृद्ध असतो. त्यामध्ये जीवनसत्त्वे, फायबर आणि खनिजे या ज्यूसचे सेवन केल्याने आपली त्वचा हायड्रेट राहण्यास मदत होते. तसेच हिरव्या भाज्यांमधील अनेक पोषक घटकही शरीराला मिळतात. तुम्ही रोज त्याचे सेवन करू शकता. भाज्यांच्या ज्यूसचे सेवन केल्याने तुमची रोगप्रतिकारशक्तीही वाढते.

**हर्बल टी** – हर्बल टीचे सेवन केल्याने आपल्याला ताजेतवाने वाटते. यामुळे आरोग्याला अनेक फायदे मिळतात. तुम्ही संध्याकाळी कॅमोमाइल टी चे सेवनही करू शकता. यामुळे रात्री चांगली झोपही लागते. हा चहा प्यायल्याने ताण दूर होतो. हर्बल टीमध्ये हिबिस्कस टी, पेपरमिंट टी आणि आल्याचा चहा इत्यादींचा समावेश आहे. या चहाचे सेवन केल्याने डोकेदुखी, बद्धकोष्ठता कमी होते, रक्तदाबाची पातळी नियंत्रित राहते, सूज येणे व सांधेदुखी कमी होते.

**हळद घातलेले दूध** – हळद घातलेले दूध हे भारतीय घरांमध्ये लोकप्रिय पेय आहे. दुधात कॅल्शिअम आणि प्रथिने यासारखे पोषक घटक असतात. त्यात हळद घालून दूध प्यायले जाते. हळदीमध्ये अँटी-बॅक्टेरिअल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मा असून ती संरक्षण करण्याचे कार्य करते. हळदीचे दूध आपल्याला हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. हे दूध प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

# श्रद्धा वालकर हत्येच्या निषेधार्थ खोपोलीत भव्य मोर्चा




**खोपोली : प्रतिनिधी**

वसई येथील श्रद्धा वालकर या तरुणीची तिचा प्रियकर अफताब त्याने निर्घृण हत्या केली. तिच्या मारेकऱ्यांना तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी, त्याचप्रमाणे हा खटला जलद न्यायालयात चालविण्यात यावा, या मागणीसाठी खोपोली रविवारी (दि. २७) हिंदू सकल समाजातर्फे भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या वेळी 'नही संहेगे नही संहेगे, लव्ह जीहाद नही सहेंगे', 'प्रेम का बहाना है, हिंदू लडकिया निशाना है', 'श्रद्धा के हत्यारो को फासी दो' या घोषणांनी खोपोली बाजारपेठ दणाणून गेली.

खालची खोपोली येथील हायको कॉर्नरपासून निघालेला भव्य निषेध मोर्चा बाजारपेठ मार्गे, दीपक चौकातून, समाज मंदिर मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या प्रांगणात आला. तेथे निषेध मोर्चाचा समारोप झाला. या वेळी खारघर येथील सामाजिक कार्यकर्ते कृष्णा बांदेकर यांनी, हिंदू समाजाने जागे होण्याची आता वेळ आली आहे, यापुढे अन्याय सहन करू नका, असे आवाहन केले.

दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या मुग्धा पेंडसे यांनी सध्याच्या परिस्थितीवर कविता सादर केली. रमाजानकी कुलकर्णी यांनी सादर केलेल्या वंदे मातरम गीताने निषेध मोर्चाची समाप्ती झाली

# बोरघाटात बसचालकाचे प्रसंगावधान

## ४२ प्रवाशांचे वाचले प्राण

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावरील एका तीव्र उतारावर शनिवारी (दि. २६) रात्री खाजगी बसचा ब्रेक निकामी झाला. मात्र बस चालकाने प्रसंगावधान राखून बस समोर असणाऱ्या दगडावर नेऊन रोखून धरली. त्यामुळे या बसमधून प्रवास करणाऱ्या ४२ प्रवाशांचे प्राण बचावले.

ममता ट्रॅव्हल्स कंपनीची बस (एमएच-०४,जेके- ६२४४) लोणावळा येथून मुंब्रा (जि. ठाणे) येथे जात होती. बसमध्ये ४२ प्रवासी होते. पुणे-मुंबई महामार्गावरील मॅजिक पॉईंट येथील एका वळणावर शनिवारी रात्री ८.१५ वाजण्याच्या सुमारास बसचे ब्रेक निकामी झाल्याचे चालक प्रदीप यादव (वय २६, मूळ रा. आयोध्या उत्तरप्रदेश, सध्या रा. ठाणे) याच्या लक्षात आले. त्याने प्रसंगावधान दाखवून बस समोर असणाऱ्या दगडाला टेकवून सुरक्षित उभी केली. त्यामुळे बसमधील सर्व प्रवाशांचा जीव वाचला. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक सुमारे २० मिनिटे खोळंबली होती.

या घटनेचे वृत्त समजताच बोरघाट पोलीस सहाय्यक निरीक्षक योगेश भोसले, उपनिरीक्षक अनिल शिंदे, हेड कॉन्स्टेबल संतोष खाडे व त्याच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. व अपघातग्रस्त बसमधील प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवले. तात्काळ मदत मिळाल्याने भेदरलेल्या प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.




# सुधागडातील परळीत वाहतूक कोंडी

## प्रशासनाचे दुर्लक्ष



**पाली : रामप्रहर वृत्त**

पाली-खोपोली राज्य महामार्गावरील महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या सुधागड तालुक्यातील परळी गावात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे येथील पादचारी, प्रवासी हैराण झाले आहेत.

सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून परळी गाव व येथील बाजारपेठेची ओळख आहे. पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूला परळी गाव व बाजारपेठ पसरली आहे. आजूबाजूच्या चाळीस-पंचेचाळीस गावांतील तसेच आदिवासी वाड्यांतील लोक या बाजारपेठेवर अवलंबून आहेत.

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र पाली हे गाव याच रस्त्यावर असल्याने पाली-खोपोली राज्य महामार्गावर नेहमी पर्यटक व त्यांच्या वाहनांची वर्दळ असते. तसेच मुंबई व पुणे आणि कोकणात जाण्यासाठी या पर्यायी मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. शिवाय अवजड वाहनांचीदेखील सतत ये-जा सुरू असते. या मार्गावरील परळी येथील रस्त्याच्या दुतर्फा अस्ताव्यस्त उभी असलेली सहा आसनी वाहने, रिक्षा व दुचाकीमुळे इतर वाहनांना जाण्यास मार्ग मिळत नाही. परिणामी परळी गावात वारंवार वाहतूक कोंडी होत असते.

त्यासंदर्भात तक्रारी करूनदेखील कोणीही ठाम भूमिका घेताना दिसत नाही तसेच परळी बाजार पेठेतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना होताना दिसत नाही.

**परळी बाजारपेठ सदैव गजबजलेली असते. येथे नेहमी वाहतूक कोंडी होते. ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे. तसेच कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नेमणूक करून याबाबत उपाययोजना करण्यात यावी.**

**-दत्तात्रय दळवी, सामाजिक कार्यकर्ते,परळी, ता. सुधागड**

**परळी बाजारपेठेतील वाहतूक कोंडीबाबत ग्रामपंचायतीच्या वतीने पोलीस प्रशासनाला पत्रव्यवहार करण्यात आला असून लवकर परळी येथील वाहतूक कोंडीबाबत उपाययोजना केली जाईल.**

**-संदेश कुंभार, सरपंच, परळी ग्रुपग्रामपंचायत**

# नागोठण्याच्या तलावातील गाळ काढण्याची मागणी

**नागोठणे : प्रतिनिधी**

शहरातील मराठाआळीमधील कौंडाळ तलावातील गाळ काढून साफसफाई करावी तसेच तलाव परिसराचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कौंडाळ तलाव हा नागोठणे शहरात प्रसिद्ध आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या तलावातील गाळ गेल्या कित्तेक वर्षांपासून काढलेला नाही. त्यामुळे तलावात दगड, माती साठली आहे. तसेच शेवाळ, काटेरी झाडे-झुडपे अवाढव्य स्वरुपात वाढली असल्यामुळे कौंडाळ तलाव परिसरात दुर्गंधी बरोबरच साप, मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना निरनिराळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्याबाबत संबंधीत ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांच्याकडे वारंवार तोंडी तक्रारी करूनही परिस्थिती जैसे थे आहे.

कौंडाळ तलावातील गाळ काढून परिसराचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते किरण लाड यांनी नागोठणे ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**कौंडाळ तलावातील गाळ काढून साफसफाई करण्याचा ठराव ग्रामपंचायतीने घेतला असून, अंदाजपत्रक काढून लवकरात लवकर या कामाला सुरूवात करण्यात येईल.**

**-मोहन दिवकर, ग्रामविकास अधिकारी, नागोठणे ग्रामपंचायत**

# खोपोली वैश्यवाणी समाज अध्यक्षपदी राजन शेट्ये यांची निवड



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहर वैश्य वाणी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी राजन शेट्ये यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

खोपोली शहरात वैश्यवाणी समाजाची सुमारे दीडशे कुटुंबे वास्तव्यास असून, गेल्या अनेक वर्षांपासून संघटीत आहेत. खोपोली शहर वैश्यवाणी समाज संघटनेची विशेष सर्वसाधारण बैठक नुकतीच हेमंत तेलवणे यांचे निवासस्थानी झाली. या बैठकीत सर्वानुमते राजन शेट्ये यांची खोपोली शहराच्या निवड करण्यात आली.

**नर्सिंग कोर्स प्रवेश**

जी. एन. एम./ए. एन. एम.
सन २०२२ -२३ वर्षाकरीता प्रवेश उपलब्ध
**शैक्षणिक पात्रता :** बारावी उत्तीर्ण (आर्टस्/कॉमर्स/सायन्स)
प्रवेशाची अंतीम तारीख ३०/११/२०२२
**पत्ता :** लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग एस.टी. स्टँडसमोर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल.
**संपर्क :** ९३७२७१६१६०/९९४७७२०७७७/ ८८८८२३१८८८/९३२१२७७२०३

# कृषी औजारांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

कोकण विभागात कृषी क्षेत्राकरिता कृषी यांत्रिकीकरण हे फार महत्वाचे आहे. दिवसेंदिवस शेतीकामाकरिता मजूरांची कमतरता भासत आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रात मजूर उपलब्ध होत नाहीत तसेच मजुरांचे दर परवडत नाही. त्यामुळे कृषी क्षेत्रात कृषी औजारे आणि यंत्रे यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोकणात भात हे प्रमुख पीक असून चिखलणी, उखळणी, लागवड, फवारणी, काढणीसह सर्व प्रकारच्या कामाकरिता यंत्र उपलब्ध आहेत.

कोकणातील धारणाक्षेत्र कमी असल्याने वैयक्तिक यंत्रे खरेदी करण्यास मर्यादा आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता कृषी विभागामार्फत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान तसेच राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत कृषी अवजारे बँक स्थापन्याकरिता शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, नोंदणीकृत शेतकरी सहकारी संस्था यांना अर्थसहाय्य केले जाते. जिल्ह्यातील पीक रचनेनुसार पिकाच्या पेरणीपासून काढणी पश्चात प्रक्रियेपर्यंत शेतकऱ्यांना माफक दराने यांत्रिकीकरणाची सेवा सुविधा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे तसेच लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरण सुविधेचा लाभ देणे हा या घटकाचा मुख्य उद्देश आहे. सन २०२२-२३ या वर्षाकरिता कोकण विभागाकरिता कृषी यांत्रिकीकरण उपभियान आणि राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत एकूण चार कोटी ६६ लाख रुपयांचा निधी प्रस्तावित केलेला आहे.

कृषी औजारे बँकेचा लाभ घेण्यासाठी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, गट अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा असल्यास प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या वैध जात प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत किंवा संस्थेची संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत केलेल्याचे पत्र व संबंधित व्यक्तीचा आधारकार्ड/फोटो असलेल्या ओळखपत्रांचे स्वयं साक्षांकित प्रत ही कागदपत्रे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्जाद्वारे सादर करणे आवश्यक आहे.

कृषी औजारे बँक या घटकाचा लाभ घेण्यासाठी शेतकरी गट/नोंदणीकृत शेतकरी सहकारी संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपनी यांनी महाडीबीटी पोर्टलवर जास्तीत जास्त अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोकण विभाग कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नजिकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

**ग्रुप ग्रामपंचायत धामणसई** — दिनांक- २८/११/२०२२

**मु. पो. धामणसई, ता. रोहा, जि. रायगड**
**स्थापना १९५८**

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत धामणसईतील हद्दीतील खालील विकास कामे १५वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर निधीतून सन २०२० - २१ व २०२१-२२ हाती घेतले आहेत. सदर कामास ग्रामपंचायतने मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकास मा. उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. तरी सदर कामे करणेसाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग नोंदणीकृत | निवादा सादर करण्याची | | | कोरे निवादा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंतिम दिनांक | वेळ | ठिकाण | |
| १) | धामणसई गावामध्ये गटार लाईन टाकणे. | १,०००००/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| २) | गावठाण गाव येथे गटार लाईन टाकणे. | १,०००००/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| ३) | हनुमान मंदिर पाण्याची टाकी बांधणे. | ५९,५३४/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| ४) | भवानी मंदिर पाण्याची टाकी बांधणे. | ५९,५३४/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| ५) | इंदरदेव टाकूरवाडी विहिरीसमोर कॉँक्रिटीकरण करणे. | ५५,०००/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| ६) | भैरवीनगर येथे बंदिस्त गटार लाईन बांधणे. | १,१२,०७९/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |
| ७) | जंगम स्मशनभूमीजवळ मातीभराव करणे. | ५४,०११/- | ६ महिने | नोंणीकृत | ५ डिसेंबर | स, ११ ते ५ | ग्रा.पं. धामणसई | २००/- |

**जावक क्र. अटी व शर्ती :-**

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडा कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील व आवश्यक की भरून त्यांची प्रत उपलब्ध केले जातील.
२) प्राप्त निविदा दिनांक ६/१२/२०२२ रोजी स.ठिक. ११:३० वाजना ग्रा.पं. कार्यालयात उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे हस्ते उघडणेत येतील.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपने रजिस्ट्रेशनचे दाखले सत्यप्रत केलेले असावेत
४) कोणत्याही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
५) देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर, विमा (GST २) सुरक्षा, अनामत सेस व उपकराची रक्कम कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी / सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेख खाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद करण्याचा अधिकार ग्रा.पं. वे राखून ठेवला आहे.
६) काम पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर संबंधित ठेकेदार यांना सुरक्षा अनामत परत केली जाईल
७) प्राप्त मूल्यांकनानुसार उपलब्ध निधीप्रमाणे रक्कम अदा केली जाईल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेली तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही
९) निविदा फॉर्म की ना परतावा समजावी.
१०) विविध मंजूर केल्यास १००/- रु. स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत धामणसई**
**ता. रोहा, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत धामणसई**
**ता. रोहा, जि. रायगड**

# नवी मुंबईत कांदळवनावर सीसीटीव्ही वॉच

## वनविभागाकडून सर्वेक्षण; १११ ठिकाणे निश्चित



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वनविभागाने आता कांदळवण क्षेत्रात सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात येणार असून अधिकार्‍यांनी जागांचे सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार आधीचे ५१ आणि आता ४६ असे एकूण १११ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. याबाबत लवकरच निविदा प्रक्रिया राबवून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यवनीत करण्यात येईल, अशी माहिती वनविभागाने दिली आहे. नवी मुंबई शहरातील कांदळवनावर भराव टाकून तसेच अतिक्रमण करण्यात आलेले आहे. त्यामुळे याला आळा घालण्यासाठी हा उपाय करण्यात येणार आहे.

दिवसेंदिवस जमिनीचे भाव वधारत आहेत. त्यामुळे काही असामाजिक घटकांकडून खाडीतील कांदळवनांवर अतिक्रम करून त्याचा अयोग्य वापर करण्याचे सत्र सुरू असून जैवविविधता नष्ट करण्यात येत आहे. त्यामुळे हे अतिक्रमण टाळण्यासाठी, अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी शासनाने कांदळवन क्षेत्रात सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील कांदळवनावर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात १०६ संवेदनशील ठिकाणी एकूण २७९ सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील. यासाठीची ३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प तीन टप्प्यात राबविण्याचे निश्चित करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात भिवंडी, दुसर्‍या टप्प्यात पश्चिम व मध्य मुंबई व तिसर्‍या टप्प्यात नवी मुंबई व ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचा समावेश आहे. त्यासाठी वन विभागाकडून कॅमेरे बसवण्याबाबत जागांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात १११ ठिकाणी निश्चित करण्यात आली असून लवकरच निविदा प्रक्रिया राबवून या ठिकाणी कॅमेरे बसवण्यात येतील, अशी माहिती वन परिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण नवी मुंबई सुधीर मांजरे यांनी दिली.

वाशी खाडीत राखीव कांदळवनात तसेच सिडकोच्या जागेत राडारोड्याचा भराव टाकून तेथील कांदळवन नष्ट करून मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या बांधून भाडे आकारणी करण्यात येत होती. एकुण ३.८८ हेक्टर क्षेत्रावर अंदाजे १७, २४२ कांदळवन वृक्षांची कत्तल करून पर्यावरणात्मक दृष्ट्या १ कोटी २६ लाखांचे प्रति वर्ष नुकसान केलेले आहे.

### अतिक्रमणावर कारवाई

**वन विभाग, सिडको आणि महापालिका यांनी संयुक्तपणे ३५४ झोपड्यांवर कारवाई केली आहे. यात १०३ झोपड्या अधीसूचित कांदळवनात होत्या त्यावर वन विभागाने स्वतंत्र कारवाई करून १० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. सलग चार दिवस सातत्याने ही कारवाई करून येथील झोपड्या जमीनदोस्त करून येथील नाल्यांचे प्रवाह पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला आहे.**

# गोवर आजाराबाबत खबरदारी घेण्याचे आवाहन

## उरण तालुक्यात एकही रुग्ण नाही -डॉ. इटकरे

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

गोवर हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून, या आजाराने मुंबईमध्ये थैमान घातले आहे. या आजाराने पनवेल तालुक्यात प्रवेश केला आहे, मात्र पनवेल तालुक्याला लागून असलेल्या उरण तालुक्यात गोवर आजाराचा एकही रुग्ण आढळून आला नाही. तरी सर्वांनी योग्य ती खबरदारी व आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.

वाढत्या गोवर आजाराच्या प्रादुर्भावाबाबत माहिती देताना इटकरे यांनी सांगितले की, गोवर हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. रुग्णाच्या संपर्कात आल्यानंतर १० ते १२ दिवसानंतर त्याची लक्षणे दिसतात. ताप खोकला, वाहणारे नाक, डोळ्यांची जळजळ इत्यादी गोवर आजाराची लक्षणे आहेत. ज्यांना कोणाला गोवर आजाराची लक्षणे आढळली आहेत.

अशा नागरिकांनी आपल्या लहान मुलांना त्वरित नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा शासकीय रुग्णालयात दाखल करावे. जेणेकरून गोवर आजारावर योग्य वेळेत उपचार होईल व गोवर आजार आटोक्यात येईल. उरण तालुक्यात गोवरचा एकही रुग्ण नाही मात्र सर्वांनी योग्य ती खबरदारी घ्यावे, असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.

# आमदार गणेश नाईक यांची अपघातग्रस्तांना मदत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील पामबीचवरील वाझिरणी चौक लगत सेवा रस्त्यावर अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात दोन युवक जखमी झाले होते. या घटनेनंतर जवळूनच जाणारे ऐरोलीचे भाजप आमदार गणेश नाईक यांनी तातडीने अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल केले.

शनिवारी रात्री बाराच्या सुमारास आपले काम आटोपून ऐरोलीचे भाजपा आमदार यांच्या गाड्यांचा ताफा बोनकोडेच्या दिशेला निघाला होता. सीवूड्सपासून निघाल्यावर पामबीचवरील वाझिरणी चौक लगत सेवा रस्त्यावर दोन व्यक्ती रस्त्यावर पडलेल्या दिसल्या. हे दृश्य नाईक यांच्याही नजरेस पडतात त्यांनी गाडी थांबवली. पडलेल्या युवकांच्या जवळ गेले असता दुचाकी अपघात झाल्याचे लक्षात आले त्या दोघांपैकी एक शुद्धीत होता. त्यानेच वळण घेताना अन्य एका दुचाकीने धडक दिल्याची माहिती दिली. दरम्यान, नाईक यांच्या इशार्‍यावरून ताफ्यातील एकाने रुग्णवाहिकेला पाचारण केले. नाईक यांनी इतरांच्या मदतीने दोन्ही युवकांना रुग्णवाहिकेत बसवले व मार्गस्थ झाले.

याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन भिंगारदिवे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, या अपघातात प्रजापती नावाच्या युवकाचा एक हात फ्रॅक्चर झाला तर सावंत नावाचा युवक किरकोळ जखमी झाला आहे. आमदारांनी गाडी थांबवून अपघातग्रस्त जखमींना मदत केल्याचे कौतुक समाज माध्यमातून जोरदार होत आहे.

# संविधान दिनानिमित्त घारापुरी बेटावर स्वच्छता मोहीम

**उरण : रामप्रहर वृत्त**

संविधान दिनानिमित्त घारापुरी बेटाच्या किनार्‍यावर स्वछता मोहीम राबविण्यात आली. घारापुरी बेटाच्या किनार्‍यावर चारही बाजूने मोठ्या प्रमाणात समुद्रातून कचरा वाहून येत आहे. त्यामुळे जागतिक पर्यटनस्थळ असलेल्या घारापुरी बेटाचे किनारे कचरायुक्त होत आहेत. त्यामुळेच किनारा स्वच्छतेसाठी ही मोहीम राबविण्यात आली.

घारापुरी बेटावर अवघ्या जगभरातून पर्यटक येत असतात. घारापुरी बेटावर उरणचे तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. २६) स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. उरण तालुक्यातील अनेक विभागांचे शासकीय कर्मचारी, एनजीओ, बीआरसी, सीआरसी यांनी या मोहिमेत भाग घेतला होता. उरण तालुक्यात घारापुरी येथे पुरातन लेणी आहेत. येथे फिरायला आल्यावर काही पर्यटक येथे रिकाम्या पाण्याच्या बाटल्या आणि रिकामी खाऊचे पाकीटे फेकून देत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. तसेच घारापुरी बेटावर भरती ओहोटीला किनार्‍यावर मोठ्या प्रमाणात कचरा वाहून येतो त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा पसरतो.



हा कचरा उचलण्यासाठी घारापुरी ग्रामपंचायतीकडे मोठी यंत्रणा उपलब्ध नसल्याने कचरा संकलनामध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे घारापुरी बेटावर अशा प्रकारच्या स्वच्छता मोहिम राबविण्यात येतात. या मोहिमेत तालुक्यातील सर्व विस्तार अधिकारी, सर्व ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, उरण पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींमधील कर्मचारी, वनविभागाचे कर्मचारी, एनजीओ, बीआरसी, सीआरसी उरण यांनी सहभाग घेतला होता.

## निवडक

### स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : खारघर रेल्वे स्टेशन परिसरात फुटपाथ वर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्ष, रंग गहूवर्णीय, उंची ५ फूट ४ इंच, चेहरा गोल, केस वाढलेले असून अंगात शर्ट व काळी जीन्स पॅन्ट तसेच पायात काळी सॅन्डल घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने खारघर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत धनवडे यांच्याशी संपर्क साधावा.

### ऋतुजा गवस अध्यक्षपदी

**नवी मुंबई :** येथील ऋतुजा गवस यांची नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या पश्चिम महाराष्ट्र



अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. गवस या नवी मुंबईतील रहिवाशी असून ठाण्यातील जिजाई बालमंदिर शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे क्षेत्रात देखील योगदान असून; साहित्य क्षेत्रातील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. साहित्य क्षेत्रा बरोबरच पर्यावरण चळवळीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे, नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था, भारत या संस्थेच्या त्या मुंबई जिल्हा महिला अध्यक्षा म्हणून आजवर कार्यरत होत्या. संस्थेतील त्यांचे कार्य पाहून त्यांच्यावर पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# उरणमध्ये २६/११च्या शहिदांना अभिवादन

**उरण : बातमीदार**

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी व जवान शहिद झाले. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ संपूर्ण महाराष्ट्रात महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे २६ नोव्हेंबर हा शहिद दिन करण्यात आला. शहिदांचे स्मरण भावी नविन पिढीलाही रहावे व देशाप्रती आपल्या कर्तव्याची जाणीव नेहमी राहावी या दृष्टीकोनातून २६/११च्या दहशतवादि हल्ल्यातील अधिकारी, जवानांना उरण पोलीस स्टेशन येथे अभिवादन करण्यात आले.




उरण पोलीस लाईन नागाव ते उरण पोलिस स्टेशनपर्यंत हातात मेणबत्ती तसेच बॅनर, फलक घेऊन भव्य अशी रॅली काढण्यात आली. उरण पोलीस स्टेशन येथे शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. देशभक्ती गीतांचा कार्यक्रमही झाला. या वेळी विविध संख्या संघटना सहभागी झाल्या होत्या. उरण पोलिस स्टेशन मार्फतही या वेळी शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीने शहीदांच्या प्रतिमेवर पुष्प अर्पण करून मेणबत्ती लावून शहीदांना वदंन करून शहीदांच्या कार्याचे समरण केले.

या वेळी न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे सहाय्यक आयुक्त धनाजी क्षीरसागर, उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील आदी उपस्थित होते. या वेळी दोन मिनिट स्तब्ध उभे राहून सर्वांनी शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना उरण तालुका अध्यक्ष वैभव पवार, उपाध्यक्ष गणेश पाटील, सचिव हेमंत सुर्यराव, आयटी सेल प्रमुख निलेश गोहिल, संपर्क प्रमुख वैभव तिलोरे, उपसचिव रवींद्र मोकल, युवा आघाडी अध्यक्ष स्वप्नील कुंभार, महिला युवा अध्यक्ष समृद्धी गोडे, उपाध्यक्ष धनेश मळगावकर, सचिव मयूर पाटील, उपसचिव वैभव मोरे, महीला आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रिती भारती (रांजणे), उपाध्यक्ष स्नेहा गोडे, सचिव नविना भोईर, उपसचिव माधुरी पाटील आदी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना उरणच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# जेएनपीएमध्ये संविधान दिन साजरा

**उरण : बातमीदार**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणमध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी जयवंत ढवळे मुख्य मॅनेजर, गिरीश थॉमस, जेएनपीए विश्वस्त दिनेश पाटील व विश्वस्त रवी पाटील, माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील आदी उपस्थित होते.

प्रथम संविधान प्रस्ताविकाचे सामुदायिक वाचन करण्यात आले. त्यानंतर संविधानाची सविस्तर माहिती जयवंत ढवळे व भूषण पाटील यांनी दिली. ७५ वर्षांपासून भारत देश एकसंघ ठेवण्याचे काम संविधानाने केले आहे व संविधानामध्ये सामाजिक, आर्थिक व राजनीतीक समता सांगितले असून सर्वांनी संविधानचे प्रसार, प्रचार व संरक्षण करावे असे आवाहन या वेळी करण्यात आले. जेएनपीएचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# 'युईएस'मध्ये आंतरशालेय स्पर्धा

**उरण : रामप्रहर वृत्त**

युईएस स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि. २५) पालक मैदान येथे वक्तृत्व, एकल नृत्य, चित्रकला, वादविवाद, एकल गायन, स्टँड अप कॉमेडी आणि पारंपारिक वेशभूषेतला वधु वराचा देखावा असे वैविध्यपूर्ण विषय असलेली 'आंतरशालेय स्पर्धा' गटनिहाय आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेला सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सोनाली म्हात्रे, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनियर कॉलेजच्या एचओडी, पूर्व-प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील सुपरवायझर्स तसेच आपल्या व इतर शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

उरण तालुक्यातील एकूण १२ शाळेतील १७५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. या सर्व शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत पाठवून, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देऊन आत्मविश्वास दिला. अशारितीने ही आतंरशालेय स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात झाली.





# जेता चित्रपट प्रदर्शित

## रसायनीतील प्रज्ञाची भूमिका

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील एचआयएल कंपनीचे माजी कर्मचारी बाबासाहेब धोंडीबा सोनावणे यांची कन्या प्रज्ञा सोनावणे-डावरे एचओसी शाळेच्या माजी विद्यार्थीनी असून त्यांचा 'जेता' चित्रपट २५ नोव्हेंबर रोजी सर्व चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला आहे.

रसायनीतील प्रज्ञा सोनावणे-डावरे यांनी याअगोदरही टिव्ही सिरीयलमध्ये काम केले आहे. सध्या त्यांचा संजू एन्टरटेनमेंट 'जेता' चित्रपट येत असून या चित्रपटात त्यांनी चित्रपटातील नायिकेच्या वहिनीची भूमिका साकारली आहे. त्यांनी या वहिनीच्या भूमिकेत अप्रतिम अशी भूमिका साकारली आहे. हा चित्रपट मजा, मस्ती, सस्पेन्स, ॲक्शन यांनी भरलेला असून हा चित्रपट रसायनीकरांनी आवर्जून पहावा, असे आवाहन अभिनेत्री प्रज्ञा सोनावणे-डावरे यांनी केले आहे.




# दिघोडे येथील शाळेचे राष्ट्रीय बालविज्ञान स्पर्धेत यश

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय बाल विज्ञान स्पर्धेची जिल्हास्तरीय फेरी नुकतीच झाली. यात उरण तालुक्यातील दिघोडे येथील महात्मा गांधी शाळेतील विद्यार्थिनींनी बाजी मारली आहे. रानभाज्यांचे आरोग्यदायी महत्त्व हा प्रकल्प या विद्यार्थिनींनी सादर केला होता. या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

तिसाव्या राज्यस्तरीय राष्ट्रीय बालविज्ञान स्पर्धेच्या विविध फेर्‍या संपूर्ण राज्यातून घेण्यात येत आहेत. यात दिघोडे येथील महात्मा गांधी शाळेतील नववीच्या विधी नवाळी आणि भूमिका नवाळी या विद्यार्थिनींनी सादर केलेला दुर्मीळ रानभाज्यांचे महत्त्व पाककृतीतून विशद करणे या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली आहे. यासाठी शिक्षिका वंदना बडगुजर यांचे, मार्गदर्शन तर प्राचार्य एन. एन. नाईक यांचे प्रोत्साहन लाभले.

शाळेला मिळालेल्या यशाबद्दल प्राचार्य एन. एन. नाईक यांनी विद्यार्थिनी आणि मार्गदर्शक शिक्षिकांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.



# साजगाव यात्रेनंतर कचऱ्याचे साम्राज्य



**खोपोली : प्रतिनिधी**

साजगावच्या बोंबल्या विठोबाची जत्रा संपली आणि व्यापारी कचरा तेथेच टाकून निघून गेले. त्यामुळे यात्रा परिसरात सध्या सर्वत्र कचराच कचरा पसरला असून, स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत.

धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साजगाव येथील विठोबा मंदिर परिसरात कार्तिकी एकादशी निमित्ताने सलग पंधरा दिवस यात्रा भरली होती. संपूर्ण राज्यातून भाविक आणि ग्राहकांनी विठूरायाच्या दर्शनासाठी आणि खरेदीसाठी गर्दी केली होती. यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सुकी मासळी बाजार आणि खाऊचे मार्केट. यासोबतच आकाश पाळणे, लोकनाट्य, अशा विविध कार्यक्रमांचे आकर्षण असल्याने या यात्रेत करोडो रुपयांची उलाढाल झाली.

शेकडो व्यापाऱ्यांनी यात्रेत दुकाने लावली होती. तर असंख्य भाविक या यात्रेला आले होते. सोमवारी साजगावच्या बोंबल्या विठोबाची यात्रा संपली. व्यापारी निघून गेले. त्यांनी मागे ठेवला निव्वळ कचरा. साजगाव येथील विठोबा मंदिर परिसर कचऱ्याने भरून गेला आहे. डास आणि माश्यांचा प्रादुर्भाव वाढला असून या ठिकाणी दुर्गंधी पसरल्याचे जाणवू लागले आहे.

# दहिवली केंद्रातील शाळांना प्रथमोपचार पेटीचे वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

देगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिनेश नथुराम गुगळे यांच्यातर्फे व देगाव शाळेचे शिक्षक शंकर शिंदे यांच्या प्रयत्नांनी माणगाव तालुक्यातील दहिवली केंद्रातील १० शाळांना शुक्रवारी (दि. २५) कुमशेत येथील प्राथमिक शाळेत केंद्रप्रमुख अजय पाटील यांच्या हस्ते प्रथोमचार पेट्यांचे वाटप करण्यात आले.

माणगाव तालुक्याच्या दहिवली केंद्रातील दहिवली (मराठी), देगाव, कुमशेत, वडवली कोंड, शिरवली, शिरवली आदिवासीवाडी, देगाव आदिवासीवाडी, तारणे, कुशेडे आणि दहिवली कोंड या दहा शाळांना देगावचे उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते दिनेश गुगळे यांच्यातर्फे व पदवीधर शिक्षक शंकर शिंदे यांच्या प्रयत्नांने शुक्रवारी प्रथमोपचार पेटी वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमाला दहिवली केंद्रातील सर्व शाळांचे मुख्यध्यापक, पदवीधर शिक्षक व सहकारी शिक्षक उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात संविधान दिन उत्साहात साजरा



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष अलिबाग तालुक्यातर्फे शनिवारी (दि. २६) येथील भाजप रायगड जिल्हा कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

भाजपचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, तालुका उपाध्यक्ष सुनील दामले, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक हिरामण कोकाटे, तालुका सरचिटणीस संतोष हरिभाऊ पाटील, सोशल मिडिया अलिबाग विधानसभा संयोजक पंकज अंजारा, महिला मोर्चाच्या अलिबाग तालुका सरचिटणीस जान्हवी पारेख, रामराज विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील यांच्यासह शिक्षक सेल व भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने शनिवारी (दि. २६) संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. तुळशिदास मोकल यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्त्व पटवून दिले व संविधान उद्देशिकेचे वाचन केले. डॉ. सम्राट जाधव यांनी संविधान निर्मितीचा इतिहास सांगितला. तसेच संविधान जाणून घेणे, संविधानाचा सखोल अभ्यास करणे किती महत्त्वाचे आहे, हे उपस्थितांना पटवून दिले.

एक जबाबदार नागरिक या नात्याने आपण सर्वांनी संविधानाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे सांगून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी उपस्थितांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत थोरात यांनी केले. प्रा. शत्रुघ्न लोहकरे, डॉ. अनिल शिंदे, प्रा. सीमा भोसले, डॉ. कमलाकर कांबळे, प्रा. शिल्पा खाडे, प्रा. वैशाली कानावडे यांच्यासह विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रा. सुकुमार पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली.

**म्हसळा : प्रतिनिधी**

येथील पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. २६) संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या वेळी २६/११ रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात विरमरण आलेल्या पोलीस आधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आदरांजली वाहण्यात आली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांनी या वेळी उपस्थितांना भारतीय संविधानाविषयी माहिती दिली. उपस्थितांनी भारतीय संविधानाची शपथ घेतली.

पत्रकार संजय खांबेटे, उदय कळस, भारतीय बौद्ध महासभेचे संतोष जाधव, अनंत मोरे, अंकित धोत्रे, सुर्यकांत तांबे, रत्नमाला जाधव, ज्योती साळवे, सुकेशनी सुर्यतळ, आशिनी मोरे, प्रणिता मोरे, पोलीस पाटील संघटनेचे अनंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक बांडे, हेडकॉन्स्टेबल कांबळे, हवालदार नलावडे, वर्षा पाटील यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



**माणगाव : प्रतिनिधी**

येथे बौद्धधम्म सामाजिक संस्थेत शनिवारी (दि. २६) संविधान दिन साजरा करण्यात आला. या संस्थेचे संस्थापक पंकज तांबे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच संविधान जागृतीबद्दल मार्गदर्शन केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे देशात स्वातंत्र्य, समता व बंधुता आजही टिकून आहे, असे सांगून पंकज तांबे यांनी भारतीय संविधानाविषयी माहिती दिली. संस्थेचे स्वप्नील शिर्के, संभाजी गायकवाड, सिद्धी वाढवळ, समीरा वाढवळ यांच्यासह अनेक कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



**महाड : प्रतिनिधी**

भारतीय संविधान दिनानिमित्ताने महाड पत्रकार संघाच्या वतीने येथील तहसील कार्यालयात शनिवारी (दि. २६) वर्तमानपत्र वाचनालय सुरु करण्यात आले. या उपक्रमामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना वाचनाचा आनंद घेता येणार आहे. संविधान दिनाच्या निमित्ताने राबवलेल्या या उपक्रमाचे तहसीलदार सुरेश काशीद यांनी कौतुक केले.

या वाचनालयाचे उद्घाटन तहसीलदार सुरेश काशीद यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे आणि गोपाळ कांबळे यांच्या हस्ते तहसीलदार काशीद यांना तहसील कार्यालयासाठी संविधानाची प्रत भेट देण्यात आली.

प्रास्ताविकात महेश शिंदे यांनी महाड पत्रकार संघाच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना समान अधिकार दिले. संविधान हा आपला सन्मान असून, पत्रकार संघाने सुरु केलेला हा उपक्रम वाचन चळवळ पुढे नेण्यास मदत करणारा ठरणार आहे, असे तहसीलदार सुरेश काशीद यांनी या वेळी सांगितले. पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

महाड उपविभागीय कार्यालयाचे रवींद्र भोसले, नायब तहसीलदार अरविंद घेमुड,निवडणूक शाखेचे भारत जाधव, वृषाली पवार, महाड पत्रकार संघाचे श्रीकांत सहस्त्रबुद्धे, राजेंद्र जैतपाल, उदय सावंत, निलेश लोखंडे, नितेश लोखंडे, योगेश भामरे, सामाजिक कार्यकर्ते अनंत कांबळे यांच्यासह महसुल कर्मचारी उपस्थित होते. पत्रकार संघाचे सचिव रोहित पाटील यांनी आभार मानले.



**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शनिवारी (दि. २६) भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे तर मुख्याध्यापक बादशा भोमले यांनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख यांनी अत्यंत सोप्या भाषेत उपस्थित विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून दिले. स्वराली चौधरी या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली पाटील यांनी केले. या वेळी पर्यवेक्षक दिलीप मोळीक यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंबवणे मॅडम यांनी आभार मानले.

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील माध्यमिक विद्यालय-वाघोशी येथे शनिवारी (दि. २६) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी व्याख्याते राजेश गायकवाड यांनी संविधान विषयक जाणीव जागृती केली. या कार्यक्रमात सर्वांनी मिळून संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

व्याख्याते राजेश गायकवाड यांनी संविधानातील महत्त्वाची कलमे, नागरिकांचे मुलभूत हक्क व कर्तव्य यांची माहिती दिली. तसेच संविधानाची गरज का आहे, या बाबत सविस्तर विवेचन केले.

या वेळी संविधान रॅलीचे व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नरेश शेडगे, विकास निकम, संतोष गायकवाड, सुजाता गोळे आदी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. राजेश गायकवाड यांनी उपस्थितीतांना संविधान उद्देशिकेचे वाटप केले.



**पाली : प्रतिनिधी**

जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात शनिवारी (दि. २६) संविधान गौरव दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. येथील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचाऱ्यांनी तसेच उपस्थित नागरिकांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

सुधागड तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान गौरव दिनानिमित्त येथे असंसर्गजन्य आजार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सर्व लाभार्थींचे वजन, उंची, रक्तदाब व रक्तातील साखर याची तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार मुळे, डॉ. स्मिताराणी खिलारे, आरोग्य सहाय्यक वामन मांगे, आरोग्य सहाय्यीका सानप, औषध निर्माता सागर शिंदे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# भारत-न्यूझीलंड दुसरी वनडे रद्द

## पावसामुळे टीम इंडियाचे मालिका विजयाचे स्वप्न भंगले

**हॅमिल्टन : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना रविवारी (दि. २७) हॅमिल्टन येथील सेडॉन पार्क स्टेडियमवर खेळवला जाणार होता, मात्र पावसामुळे हा सामना रद्द झाल्याने न्यूझीलंडमध्ये शिखर धवनच्या नेतृत्वाखाली युवा टीम इंडियाचे मालिका विजयाचे स्वप्न भंगले. आता मालिका वाचविण्यासाठी भारताला तिसरा आणि अंतिम सामना जिंकणे गरजेचा आहे, जेणेकरून मालिकेत बरोबरी साधता येईल.



न्यूझीलंडचा कर्णधार केन विलियम्सनने सलग दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी या सामन्यात बदल केला होता. न्यूझीलंड संघात दुखापतग्रस्त अॅडम मिल्नेच्या जागी मायकेल ब्रेसवेलला स्थान देण्यात आले होते, तर भारतीय संघातही दोन बदल करण्यात आले होते. संजू सॅमसनच्या जागी अष्टपैलू दीपक हुडाला आणि शार्दुल ठाकूरच्या जागी दीपक चहरला संधी देण्यात आली होती. शार्दूलला पाठीचा त्रास अधिक जाणवत असल्याने सुरक्षेचा उपाय म्हणून संघ व्यवस्थापनाने हा निर्णय घेण्यात आला.

सामना सुरू होण्याआधीच हॅमिल्टन येथील सेडॉन पार्कवर खूप पाऊस पडला असल्याने मैदान ओलसर झाले होते. त्यामुळे नाणेफेकीला विलंब झाला तसेच १५ मिनिटे उशिराने सामन्याला सुरुवात झाली. पावसामुळे सामना थांबविण्यात आला तेव्हा पहिल्या पाच षटकांत भारतीय सलामीवीरांनी चांगली सुरुवात केली होती, पण त्यानंतर पुन्हा पावसाला सुरुवात झाली.

पावसामुळे सामन्यातील नियमात बरेच बदल करण्यात आले. पंचानी सांगितलेल्या माहितीनुसार २९-२९ षटकांचा सामना होणार होता. त्या दरम्यान भारताने कर्णधार शिखर धवनच्या रूपाने एक विकेट गमावली. त्यानंतर आलेला मिस्टर ३६० सूर्यकुमार यादवने शुबमन गिलसोबत ६६ धावांची ताबडतोड भागीदारी केली. सूर्यकुमार ३४ धावांवर आणि शुबमन ४५ धावांवर असताना पुन्हा पावसाला सुरुवात झाली आणि अखेर सामना रद्द करण्यात आला.

ऑकलंडमध्ये शुक्रवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने भारताचा सात गडी राखून पराभव केला होता. ३०६ धावा करूनही टीम इंडियाचा पराभव झाला. अशा स्थितीत भारतीय गोलंदाजांना तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात पहिल्या सामन्यातील चुका सुधारून चांगली गोलंदाजी करणे गरजेचे आहे. मालिका बरोबरीत सोडवण्याची ही शेवटची संधी असेल.

### फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत

# अर्जेंटिनाचा मेक्सिकोवर विजय



**लुसैल : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत अर्जेंटिनाचा संघ विजयी मार्गावर परतला आहे. सौदी अरेबियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यात या संघाला पराभव स्वीकारावा लागला होता. यानंतर अर्जेंटिनाने आपल्या दुसऱ्या सामन्यात मेक्सिकोला २-० ने पराभूत करून उपउपांत्यपूर्व फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवल्या.

अर्जेंटिना आणि मेक्सिको यांच्यातील सामन्यात पूर्वार्धात दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. यानंतर पुन्हा उलथापालथ होण्याची शक्यता होती, परंतु या सामन्याच्या ६४व्या मिनिटाला मेस्सीने एगिल डी मारियाकडून शानदार पास काढून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर लिओनेल मेस्सीने युवा खेळाडू एन्झो फर्नांडिसला योग्य वेळी पास केले आणि त्याने सामन्याच्या ८७व्या मिनिटाला गोल करून अर्जेंटिनाची आघाडी २-० अशी वाढवली, जी निर्णायक ठरली.

या सामन्यातील विजयासह अर्जेंटिनाचा संघ क गटात दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. हा संघ पोलंडच्या एका गुणाने मागे आहे. अर्जेंटिनाचा शेवटचा गट सामना पोलंडशी आहे आणि तो जिंकून मेस्सीच्या संघाला उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित करायचे आहे. त्याचबरोबर पुढील फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी मेक्सिकोला सौदी अरेबियाचा पराभव करावा लागेल. यापूर्वी याच सौदी अरेबियाने बलाढ्य अर्जेंटिना संघाला पराभूत करून यंदाच्या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत मोठा उलटफेर केला होता, पण दुसऱ्या सामन्यात अर्जेंटिनाने चूक केली नाही.

# अलिबागमध्ये डॉक्टरांची क्रीडा स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूडमधील डॉक्टर व त्यांच्या कुटूंबीयासाठी क्रीडा स्पर्धा अलिबागजवळील आरसीएफ वसाहतीमधील क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आली होती. वैद्यकीय उपचाराबरोबरच शरीर फिट ठेवण्यासाठी क्रीडा प्रकार महत्त्वाचा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



(छाया : जितू शिगवण)

अलिबाग व मुरूड मेडिकल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, बॅटमिंटन, कॅरम, टेबल टेनिस आदी खेळांचा सहभाग होता. या स्पर्धेत एकूण १५३ डॉक्टरांसह त्यांचे कुटूंबीय सहभागी झाले. या क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ रायगड जिल्हा युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष यतीराज पाटील, डॉ. महेंद्र दोषी यांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश गवळी, माजी अध्यक्ष डॉ. मयूर कल्याणी, डॉ. अशिष भगत, डॉ. संदेश पाटील, डॉ. अनघा भगत, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. मकरंद आठवले, डॉ. राजेंद्र मोकल, डॉ. प्रमोद खानावकर, असोसिएशनचे पदाधिकारी डॉ. सोनाली नाईक, डॉ. प्रणाली पाटील, डॉ. अमेय केळकर, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. राजाराम हुलवान, डॉ. वसीम पेशमाम, डॉ. सुबोध पाटील आदी उपस्थित होते.

अलिबाग व मुरूड मेडिकल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेली ही स्पर्धा स्तुत्य उपक्रम आहे. धावपळीच्या जीवनात नागरिकांचे आरोग्याकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे अनेक आजारांना बळी पडावे लागते, परंतु वैद्यकीय उपचाराबरोबरच मानसिक व शारीरिक तणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी नियमित कसरत व खेळणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे सर्व डॉक्टरांनी एकत्र येऊन भरविलेल्या या स्पर्धेतून शरीर सदृढ ठेवण्याचा संदेश देण्यात आला.

# रोहा तालुका निवड चाचणी कुस्ती स्पर्धा उद्या यशवंतखारला

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुका कुस्तिगीर संघाच्या वतीने तालुका कुस्ती चाचणी स्पर्धा मंगळवारी (दि. २९) यशवंतखार येथे रायगड जिल्हा कुस्तीगिर संघाचे कार्याध्यक्ष सुभाष घासे, सरचिटणीस मारुती आडकर, तालुका अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या स्पर्धेसाठी तालुक्यातील सर्व पैलवांनानी १० वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या स्पर्धेत विविध वजनी गट असून यामध्ये पुरुष वरिष्ठ गट, गादी, माती ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७, (८६ ते १२५ किलोपर्यंत) केसरी गट, वरिष्ठ पुरुष ग्रिकोरोमन गट ५५, ६०, ६३, ६७, ७२, ७७, ८२, ८७, ९७, १३० किलोपर्यंत, वरिष्ठ महिला गट ५०, ५३, ५५, ५७, ५९, ६२, ६५, ६८, ७२, ७६ किलोपर्यंत, सब ज्युनिअर मुले ४५, ४८, ५१, ५५, ६०, ६५, ७१, ८०, ९२, ११० किलोपर्यंत, सब ज्युनिअर मुली ४०, ४३, ४६, ४९, ५३, ५७, ६१, ६५, ६९, ७३, किलोपर्यंत या प्रमाणे असणार आहेत. सब ज्युनिअर मुले, मुली यांचा वयोगट १७ वर्षांच्या आतील असल्याने त्यांनी आपल्या वयाचा दाखला, बोनाफाईड शाळा प्रमुखांच्या सही-शिक्क्यासह सोबत आणने आवश्यक आहे. सब ज्युनिअर मुले मुली यांचा वयोगट १७ वर्षांच्या आतील असल्याने त्यांचा जन्म दिनांक १-१-२००६ नंतरचा असावा तसेच १-१-२००७चा जन्म असणाऱ्या कुस्तीगरानी वैद्यकीय अधिकारी यांचा दाखला व पालकांचे संमतीपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

सर्व कुस्तीगीरांनी ओरिजनल व झेरॉक्स आधारकार्ड सोबत घेऊन येणे आवश्यक आहे, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

### मर्चंट करंडक स्पर्धा

# रायगडचा नैतिक महाराष्ट्राच्या संघात



**अलिबाग : प्रतिनिधी**

मर्चंट करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या १६ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट संघात रायगडच्या नैतिक भरत सोळंकी याची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचा संघ सुरत येथे विजय मर्चंट करंडक स्पर्धा खेळण्यासाठी सोमवारी (दि. २८) पुणे येथून रवाना होईल. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशचे अध्यक्ष चंद्रकांत मते व सर्व सदस्यांनी नैतिक सोळंकेचे अभिनंदन केले आणि त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेल अर्बन बँक निवडणूक मतदान










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com